❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २२९ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

# दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

**संध्या प्रहार**




# ३७ लाख नोंदी जुन्याच

## मनोज जरांगेंच्या आताच्या आंदोलनाचा संबंध नाही : बबनराव तायवाडेंचा दावा

■ नागपूर : दैनिक संध्या

राज्यात मराठा आरक्षण आणि ओबीसी जात प्रमाणपत्राच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले आहे. कुणबी-मराठा बांधवांना मिळालेली जात प्रमाणपत्रे रद्द करण्यात आल्याच्या प्रकारामुळे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आक्रमक झाले आहेत. त्यांनी आपला पश्चिम महाराष्ट्र दौरा सुरू केला असून याप्रश्नी राज्य सरकारला थेट इशारा दिला आहे. तसेच, प्रमाणपत्रे रद्द केल्याच्या कारवाईवरून जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री आणि महसूलमंत्री यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

दुसरीकडे, मनोज जरांगे पाटील यांच्या या आक्रमक भूमिकेवर आणि टीकेवर ओबीसी नेत्यांकडूनही जोरदार पलटवार केला जात आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी जरांगे पाटील यांच्यावर सडकून टीका केली आहे. यासोबतच, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनीही या वादात उडी घेत, सापडलेल्या 58 लाख कुणबी नोंदींबाबत सविस्तर माहिती आणि आपली भूमिका मांडली आहे. या सर्व घडामोडींमुळे मराठा विरुद्ध ओबीसी हा संघर्ष आणखी तीव्र झाल्याचे पाहायला मिळत आहे. तत्कालीन



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या काळात मराठा आरक्षणाच्या नोंदी शोधण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती शिंदे समितीने राज्यात आतापर्यंत कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी अशा एकूण 58 लाख 90 हजार 155 नोंदी शोधल्या आहेत. मात्र, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या एकूण नोंदींपैकी 37 लाख 47 हजार 142 नोंदी या 1986 ते 2023 या काळातील जुन्याच असून, त्या आधारावर संबंधितांना आधीच ओबीसी प्रमाणपत्रे मिळालेली आहेत. त्यामुळे, आधीच लाभ मिळालेल्या या जुन्या नोंदींचा आणि मनोज जरांगे पाटील यांच्या सध्याच्या आंदोलनाचा कोणताही संबंध नसल्याचे स्पष्टीकरण तायवाडे यांनी दिले आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर न्यायमूर्ती शिंदे समितीला मराठवाड्यात 49 हजार 358 कुणबी नोंदी आढळल्या असून, त्यापैकी केवळ 20 हजार 143 लोकांनीच जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला व 15 हजार 597 जणांना कुणबी म्हणून ओबीसी प्रमाणपत्र मिळाले, हेच खऱ्या अर्थाने जरांगे यांच्या आंदोलनाचे यश असल्याचे बबनराव तायवाडे यांनी स्पष्ट केले. मात्र, शासनाच्या आकडेवारीनुसार शिंदे समितीच्या स्थापनेनंतर एकूण 3 लाख 11 हजार 287 लोकांना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यात आले असले तरी, त्यातील तब्बल 2 लाख 91 हजार 144 लोकांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज का केला नाही, असा महत्त्वपूर्ण सवाल आता राष्ट्रीय ओबीसी महासंघाकडून उपस्थित करण्यात आला आहे. बबनराव तायवाडे म्हणाले, ज्याच्याकडे कुणबी नोंदीचे कागदपत्र आहे, त्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळालेच पाहिजे ही राष्ट्रीय ओबीसी महासंघाची भूमिका आहे. ज्यांना ओबीसींचे प्रमाणपत्र मिळाले त्यांचे राष्ट्रीय ओबीसी महासंघात स्वागत आहे. मात्र, खोट्या कागदपत्रावर जात वैधता प्रमाणपत्र आम्ही सहन करणार नाही, असे तायवाडे यांनी स्पष्ट केले.

# मटण-मच्छी खात असाल तर ताडदेवमध्ये घर मिळणार नाही

**एजंट भावेश कावरेचा वादग्रस्त व्हिडीओ, सोशल मीडियात संताप**

■ मुंबई (दै. संध्या)




कोळी-आगरी बांधवांनी जी मुंबई उभी केली, ज्या कष्टकरी, सर्वसामान्यांनी त्यांच्या कष्टातून मुंबई उभी केली त्याच मुंबईत आता तुमचा मांसाहार हा तुम्हाला घर मिळणार की नाही हे ठरवणार आहे. तसंच काही चित्र आता सर्वत्र मुंबईत दिसतंय. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या इस्टेट एजंट भावेश कावरेचा एक व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यामध्ये तो म्हणतोय की, तुम्ही मांसाहार करत असाल तर ताडदेवमध्ये तुम्हाला घर मिळणार नाही. तुम्ही शाकाहारी असाल तर तुम्हाला घर मिळेल. भावेश कावरेच्या व्हिडीओवरून आता संताप व्यक्त केला जात आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमध्ये इस्टेट एजंट भावेश कावरे हा ताडदेव परिसरातील एका घराची माहिती सांगताना दिसतोय. तुम्ही मांसाहार करत असाल तर ताडदेवमध्ये तुम्हाला घर मिळणार नाही. तुम्ही शाकाहारी असाल तर तुम्हाला घर मिळेल, असं त्या व्हिडीओमध्ये सांगताना दिसतोय. इस्टेट एजंट असलेल्या भावेश कावरे याच्या या व्हिडीओवर आता संताप व्यक्त केला जात आहे. माणूस मच्छी, मटण किंवा चिकन खातो म्हणून त्याला घर नाकारणे ही केवळ मनमानी नाही, तर ही उघड सामाजिक भेदभावाची मानसिकता आहे. मुंबईत पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या आणि मच्छी-मटण खाणाऱ्या मराठी माणसाला आता त्याच्या ताटावरून घर मिळणार की नाही हे ठरवले जाणार का? असा सवाल विचारला जात आहे.

मुंबईत कोणी काय खावे आणि काय खाऊ नये हे ठरवणारे हे एजंट कोण? असा थेट सवाल आता उपस्थित केला जात आहे. मराठी माणसाच्या संस्कृतीवर, जगण्याच्या पद्धतीवर आणि अन्नाच्या निवडीवर बंधने घालण्याचा अधिकार कोणालाही नाही. असे वारंवार आणि मुद्दाम केले जात असेल, तर याला ठामपणे विरोध झालाच पाहिजे आणि असा भेदभाव करणाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत लोकशाही मार्गाने धडा शिकवला पाहिजे, अशी मागणी सोशल मीडियावरून जोर धरत आहे. यापूर्वीही मुंबईतील घाटकोपर, मुलुंड आणि कांदिवली यांसारख्या भागांत मराठी भाषिक आणि मांसाहारी नागरिकांना घरे नाकारल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.

## थोडक्यात...

### माजी न्यायमूर्ती यशवंत वर्मा दोषी

मुंबई : दैनिक संध्या



दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना त्यांच्या घरात सापडलेल्या रोख रकमेच्या प्रकरणात संसदीय तपास समितीने दोषी ठरवले आहे. निवासस्थानी आढळलेल्या कोट्यवधी रुपयांच्या रोख रक्कमेचा स्रोत काय होता ते सांगण्यात तसेच रकमेची मालकी सिद्ध करण्यात वर्मा हे अपयशी ठरल्यानंतर चौकशी समितीने त्यांना दोषी ठरवले आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी स्थापन केलेल्या या चौकशी समितीने आपला अहवाल आज संसदेत मांडला १४ मार्च २०२५ रोजी न्यायमूर्ती वर्मा यांच्या '३०, तुघलक क्रेसेंट' या दिल्लीतील शासकीय निवासस्थानी आग लागली होती. आग विझवण्यासाठी आलेल्या अग्निशामक दलाच्या जवानांना एका स्टोअररुममध्ये ५०० रुपयांच्या नोटांचा मोठा साठा आढळून आला. वर्मा यांनी घरात लपवलेले घबाड पाहून जवान देखील आश्चर्यचकित झाले. या प्रकरणाने संपूर्ण देशभरात खळबळ माजवली होती. या घटनेनंतर वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती. अहवालानुसार, घटनेनंतर पुराव्यांचे योग्य जतन केले गेले नाही. कायदेशीर पाहणी आणि सील ठोकण्यापूर्वीच स्टोअररुममधील परिस्थिती विस्कळीत करण्यात आली होती. तसेच, तिथून गायब झालेल्या नोटांबाबतही कोणताही स्पष्ट खुलासा झालेला नाही.

### पेपरफूट गैरप्रकाराबाबत केंद्राचा कायदा लागू



मुंबई : दैनिक संध्या

महाराष्ट्रात विविध सेवा भरतींसाठी होणाऱ्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुद्धा उपस्थित होते, त्यांनीही अनेक उपयुक्त सूचना या बैठकीत केल्या. राज्यात गेल्या काही वर्षात सातत्याने होत असलेल्या पेपरफुटी, आणि महत्वाच्या परीक्षांमधील घोळांच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला. वर्षा निवासस्थानी आज विशेषत्वाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे निर्देश दिले. ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरेल. अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत एक कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणाऱ्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

# 'शाळा ठीक करा', स्वातंत्र्यदिनापासून नवीन अभियानाची सुरुवात : अभिजीत दीपके

■ मुंबई : दैनिक संध्या

गावा गावांमधील सरकारी शाळांची स्थिती सुधारण्यासाठी 'कॉक्रोच जनता पार्टी' (CJP) चे संस्थापक अभिजीत दीपके हे स्वातंत्र्यदिनी 'शाळा ठीक करा' अभियान सुरू करणार आहेत. गावांतील सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागू नये, यासाठी हे अभियान राबवण्यात येणार असल्याचे दीपके यांनी बुधवारी सांगितले. दीपके यांनी सोमवारी देशव्यापी अभियानाची घोषणा केली होती. त्यानंतर बुधवारी या अभियानाचे नाव जाहीर करण्यात आले. 'एक्स'वरील पोस्टमध्ये दीपके यांनी म्हटले की, "स्वातंत्र्याला 80 वर्षे झाल्यानंतरही गावांतील मुलांना शाळेत मूलभूत सुविधांसाठी विनवणी करावी लागू नये."

"देश म्हणून ग्रामीण भागातील मुलांच्या बाबतीत आपण अत्यंत वाईट पद्धतीने अपयशी ठरलो आहोत. या स्वातंत्र्यदिनी CJP गावांमधील सरकारी शाळांची स्थिती सुधारण्यासाठी 'स्कूल ठीक करो' अभियान सुरू करणार आहे," असेही त्यांनी म्हटले. गावांतील सरकारी शाळांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी सरपंच आणि पालकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन दीपके यांनी केले आहे. मुलांना आवश्यक मूलभूत सुविधा



मिळवून देणे ही सामाजिक आणि नैतिक जबाबदारी असल्याचे त्यांनी म्हटले. 15 ऑगस्ट रोजी देशाच्या 80व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नागरिकांनी या अभियानासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले. आपल्या स्वतःच्या गावापासून या अभियानाची सुरुवात करणार असल्याचे दीपके यांनी सांगितले. महाराष्ट्रातील मराठवाड्यातील हिंगोली येथे सरपंचाची भेट घेऊन सरकारी शाळांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याची मागणी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या व्हिडीओ संदेशात दीपके यांनी गेल्या 80 वर्षांत गावांमधील सरकारी शाळांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला. मोठ्या शहरांमधील विद्यार्थ्यांना ज्या सुविधा मिळतात, त्या ग्रामीण भागातील मुलांना अद्याप का मिळत नाहीत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

# कुंपणानेच शेत खाल्लं! कॉन्स्टेबलला ड्रग्ज खरेदी करताना रंगेहाथ पकडलं

■ मुंबई : दैनिक संध्या

देशातील नावाजलेल्या आणि कार्यक्षम पोलीस दलांमध्ये समावेश असलेल्या मुंबई पोलिसांच्या नावाला काळिमा फासणारा एक प्रकार समोर आला आहे. ड्रग्ज तस्करीच्या एका प्रकरणात मुंबई पोलीस दलातील एका पोलीस कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे. कॉन्स्टेबल किरण इंदुलकर असे त्याचे नाव आहे. मालवणी पोलिसांनी ड्रग्ज विक्री करताना किरण इंदुलकर याला रंगेहाथ पकडले आहे. किरण इंदुलकर हा सध्या जोगेश्वरी पोलीस ठाण्यात कार्यरत होता. यापूर्वी तो मालवणी पोलीस ठाण्यात कार्यरत होता. तो ड्रग्जची विक्री करत असल्याचा संशय होता. त्यानुसार मालवणी पोलिसांनी सापळा रचून किरण इंदुलकर याला 5 ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) किंवा 'म्याव-म्याव' विकताना रंगेहाथ पकडले. या घटनेमुळे मुंबई पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. पोलीस दलातील कर्मचाऱ्याच्या गुन्ह्यातील सहभागामुळे मुंबई पोलीस दलाची प्रतिमा काळवंडली आहे.

किरण इंदुलकर हा बीडीडी नायगाव येथील रहिवासी आहे. इंदुलकर पूर्वी मालवणी पोलिस ठाण्यात कार्यरत होता. त्याला या परिसरातील ड्रग्ज नेटवर्कची माहिती असल्याचा संशय आहे. मालवणी पोलीस ठाण्यात असताना किरण इंदुलकर हा अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या टोळीच्या संपर्कात आला होता. त्यावेळीच





त्याच्याबाबत संशय असल्यामुळे किरण इंदुलकर हा तेव्हापासूनच संबंधित तपासयंत्रणांच्या रडारवर होता. यापूर्वीही किरण इंदुलकर याच्याबाबत तक्रारी आल्या होत्या. दोन वर्षांपूर्वी ताकीद देऊन इंदुलकरची बदली करण्यात आली होती. तसेच त्याला निलंबितही करण्यात आले होते. सध्या ड्रग्ज प्रकरणात अटकेत असलेल्या इंदुलकरला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी मालवणी पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे. घटनेमुळे मुंबई पोलिसांच्या प्रतिमेबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

मालवणी पोलिसांना या परिसरातील गेट क्रमांक 8 जवळ ड्रग्जची तस्करी होणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी याठिकाणी सापळा रचला. पोलिसांनी एका व्यक्तीला अमली पदार्थ विक्रेता म्हणून उभे केले. त्यावेळी किरण इंदुलकर त्याठिकाणी आला. त्याने 15 हजार रुपयांना चार ग्रॅम एमडी खरेदी केले. हा व्यवहार पूर्ण होताच, पोलिसांनी किरण इंदुलकर याला तात्काळ अटक केली. मात्र, तो पोलीस कॉन्स्टेबल असल्याचे पोलिसांनाही माहिती नव्हते. नंतर पोलिसांना किरण इंदुलकर हा कॉन्स्टेबल असल्याचे समजले तेव्हा हा सगळा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

# ठाकरेंच्या वकिलांकडून चिरफाड, युक्तिवादात घमासाण

**निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षघटनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले**

■ मुंबई (दै. संध्या)

निवडणूक आयोगाने पक्षफुटीचा निर्णय देण्याआधी दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रतेचा निर्णय महत्त्वाचा होता. पण आयोगाने शिंदेंना लाभ देण्यासाठी आधी निकाल ठरवला आणि त्यानुसार कारणे ठरवली, असा मोठा आरोप ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. निवडणूक आयोगाने 2018 सालच्या शिवसेनेच्या घटनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. शिवसेना पक्ष आणि चिन्हासंबंधी न्यायालयात सुनावणी सुरु आहे. ठाकरेंच्या वतीन ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यानी युक्तिवाद करत निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर आणि अधिकारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कपिल सिब्बल म्हणाले की, "2018 सालची घटना शिंदे गटाला मान्य नव्हती. मात्र त्याच घटनेच्या आधारे शिंदे आमदार आणि मंत्री झाले. 2018 ची घटना ही बनावट असल्याचा आरोप होता तर त्यावर निवडणूक आयोगाने कारवाई करायला हवी होती. पण एकनाथ शिंदे यांना लाभ देण्यासाठीच 2018 सालची घटना निवडणूक आयोगाने दुर्लक्षित केली." निवडणूक आयोगाने शिवसेनेबाबत स्वीकारलेला दृष्टीकोन कायम राहिला तर कोणतेही सरकार पाडता येईल. एखाद्या पक्षातून काही आमदार फुटली आणि ते स्वतःलाच पक्ष म्हणवतील. ते चिन्हावर आणि पक्षावर दावा करतील. ही पद्धत जर मान्य झाली तर ती लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे, असा मोठा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

न्यायालयात कपिल सिब्बल यांचा युक्तिवाद तीन मुद्द्यावर होता. विधिमंडळातील फूट म्हणजे पक्षातील फूट नाही, निवडणूक आयोगाने 2018 ची पक्षघटना आणि संघटनात्मक बहुमत दुर्लक्षित केले आणि आयोगाने अधिकारक्षेत्राचा वापर करण्यापूर्वी आवश्यक असलेली प्रथमदर्शनी राजकीय फूट सिद्ध झाली नव्हती, असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला. सिब्बल यांच्या मते, 2018 ची घटना आयोगाकडे सादर करण्यात आली होती. त्यावर आयोगाचा शिक्काही होता. तरीही ती रेकॉर्डवर नसल्याचा दावा करून आयोगाने चुकीचा निष्कर्ष काढला. 13 वर्षे पक्षाच्या नोंदणी आणि पदाधिकाऱ्यांच्या नोंदी पाहणाऱ्या निवडणूक आयोगाला शिवसेनेची घटना माहीत नव्हती, हा दावा मान्य होऊ शकत नाही, असे सिब्बल म्हणाले.

आयोगाला एका विशिष्ट निष्कर्षापर्यंत पोहोचायचे होते. त्यामुळे त्याने उपलब्ध कागदपत्रे आणि पक्षघटना दुर्लक्षित केली, असा आरोप सिब्बल यांनी केला. केवळ आमदारांचा गट फुटला म्हणून मूळ राजकीय पक्षात फूट पडली असे मानता येत नाही, हा सिब्बल यांच्या युक्तिवादाचा केंद्रबिंदू होता. पक्ष आणि चिन्हाच्या वादासाठी वापरल्या जाणाऱ्या परिच्छेद 15 मध्ये "राजकीय पक्ष" असा उल्लेख आहे, "विधिमंडळ पक्ष" असा नाही, असे सिब्बल यांनी न्यायालयाला सांगितले. आयोगाने





अधिकार वापरण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्याच्यासमोर केवळ दोन कागदपत्रे होती. त्यावरून राजकीय पक्षात फूट पडल्याचा निष्कर्ष काढता येत नव्हता. प्रथमदर्शनी राजकीय पक्षात फूट पडल्याचे दिसल्याशिवाय आयोगाला अधिकारक्षेत्र प्राप्त होत नाही, असे सिब्बल यांनी ठामपणे मांडले. आमदारांची संख्या जास्त असल्याने शिंदे गटालाच पक्ष मानणे ही निवडणूक आयोगाची मूलभूत चूक असल्याचा दावा करण्यात आला. पक्षप्रमुख, राष्ट्रीय कार्यकारिणी, उपनेते यांसारखी महत्त्वाची पदे निवडणुकीतून येत होती. त्यामुळे पक्ष हुकूमशाही पद्धतीने चालतो हा निष्कर्ष चुकीचा असल्याचे सिब्बल म्हणाले. आयोगाने सर्व उपनेते नियुक्त असल्याचे म्हटले. प्रत्यक्षात अनेक उपनेते निवडून आलेले होते, असे सिब्बल यांनी सांगितले.

शिवसेनेने वेळोवेळी पदाधिकाऱ्यांची माहिती आणि घटना आयोगाला दिली होती. तरी आयोगाने त्याची दखल घेतली नाही, असा आरोप करण्यात आला. दस्तऐवज नंतर तयार झाला असा दावा असेल तर त्याची चौकशी करून कारवाई करणे आयोगाचे कर्तव्य होते, असे सिब्बल म्हणाले. संघटनात्मक बहुमत ठाकरे गटाकडे असल्यामुळे आयोगाने त्या घटनेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला. शिंदे गटाकडे सुमारे 4 लाख प्राथमिक सदस्य असतील, तर ठाकरे गटाकडे 19 लाख सदस्य होते, असा दावा सिब्बल यांनी केला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर अनेक लोक त्यांच्या बाजूला गेले. त्या नंतर वाढलेल्या संख्याबळाचा वापर मूळ फूट सिद्ध करण्यासाठी करता येणार नाही, असे सिब्बल म्हणाले.

# पुन्हा चिमुकलीवर अत्याचार!

■ फूस लावली, सीताफळाच्या बागेत नेलं अन् वासनेचा शिकार बनवलं

■ पुरंदर (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील कोळविहीरे येथे १० वर्षांच्या अल्पवयीन चिमुकलीवर अत्याचार केल्याची अत्यंत संतापजनक आणि निंदनीय घटना समोर आली आहे. या प्रकरणी जेजुरी पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीला अटक केली आहे. मंगळवारी (११ ऑगस्ट) दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास कोळविहीरे गावातील एका सीताफळाच्या बागेत हा प्रकार घडला. पीडित बालिका अल्पवयीन असल्याचे माहीत असूनही, झुंबर सिताराम खोमणे (वय ६०) या नराधमाने तिला फसवून बागेत नेले आणि तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक अत्याचार केला. पीडित बालिकेच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून जेजुरी पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच पोक्सो कायद्याच्या अत्यंत गंभीर कलमांखाली गुन्हा (गु. र. नं. २२७/२०२६) दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपी झुंबर खोमणे याला ताबडतोब अटक केली आहे. जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक संगीता राणे या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहेत. या घृणास्पद घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# संपादकीय

## कृत्रिम सोबतीशी संवाद

आलिसिया स्पॅनिश, युरिना जपानी आणि फेइट अमेरिकी. आलिसिया कलाकार, तर युरिना कॉल सेंटरमधील ऑपरेटर. या तिघींचे देश वेगळे अन् संस्कृतीही वेगळी; परंतु त्यांच्यात समान धागा आहे, तो त्यांनी निवडलेल्या जोडीदारांचा. हा जोडीदार मानव नाही; तो आहे एक यंत्र, कृत्रिम बुद्धिमत्तेचा आविष्कार असलेले संवादयंत्र (एआय चॅटबॉट)! कोणत्याही देशात अशा विवाहाला कायदेशीर मान्यता नाही; तरीही त्यांनी हे पाऊल उचलले आहे. आलिसियाचा जोडीदार आहे, 'आयलेक्स', युरिनाचा 'क्लाउस'; अन् फेइटचा 'ग्रिफ'. आयलेक्स, क्लाउस, ग्रिफ ही या तिघींनी आपल्या सहचऱ्यांना दिलेली नावं. प्रियकर-प्रेयसी किंवा नवरा-बायको यांच्यात जसा संवाद होतो, तसाच त्यांच्यातही होतो. रुसवे-फुगवेही होतात; परंतु ते कडेलोटाच्या टोकावर जात नाहीत. कारण, हे यंत्ररूपी सहचर आपापल्या पत्नींशी प्रेमानं बोलतात, त्यांच्या सुख-दु:खात समरस होतात, त्यांना हवा तसा सल्ला देतात अन् मुख्य म्हणजे त्यांची स्तुती करतात! 'एआय' अशा प्रकारे काही लोकांसाठी सर्वांत जवळचा मित्र, सखा/सखी, गुरू, तत्त्वज्ञ, वाटाड्या बनलेय; जीवनसाथी बनलेय. ते 'एआय'शी मनमोकळेपणानं गप्पा मारतात, दररोजच्या जगण्यातील अडचणी सांगतात, निराशा व्यक्त करतात, नातेसंबंधांतील तणावापासून ऑफिसमधील राजकारणापर्यंत सारं काही नमूद करून सल्ला विचारतात. 'एआय' केवळ श्रवणभक्ती होत नाही, तर सहानुभूती व्यक्त करते, 'मूड' चांगला करते. आलिसिया, युरिना यांच्यासारख्यांनी त्याच्यात आपला जीवनसाथी शोधलाय. अशांची संख्या बोटांवर मोजता येण्यासारखी असली आणि बहुतेक जण 'एआय'कडे सखा/सखी म्हणून पाहत नसले, तरी त्याला आपला सोबती मानणारे अनेक आहेत. 'बॉट माझा सोबती' म्हणणाऱ्यांची संख्या वाढत असून, त्याची मोठी बाजारपेठ वेगानं विकसित होतेय. मानवाशी आभासी; परंतु भावनात्मक पातळीवर मैत्री करणारे चॅटबॉट्स 'एआय कम्पॅनियन' किंवा कृत्रिम सोबती म्हणून ओळखले जातात. २०२२मध्ये अशा 'एआय कम्पॅनियन ॲप'ची संख्या सोळा होती; ती आता तीनशेच्या वर गेलीय. रिप्लिका, चार्टर एआय, पॉलीबझ, चाय हे त्यांपैकी काही. त्यांचा वापर करणारे वाढत असून, 'टेकक्रंच'च्या अहवालानुसार, गेल्या वर्षीच्या जुलैपर्यंत असे ॲप आपल्या लॅपटॉपवर किंवा मोबाइल फोनवर डाउनलोड करणाऱ्यांची संख्या २२ कोटी होती; त्यांपैकी ८८ टक्के डाउनलोड तर २०२५च्या पहिल्या सहामाहीतील होते. वर्षभरात ही संख्या साठ कोटींवर जाईल, असा अंदाज त्या वेळी वर्तविण्यात आला होता. 'एआय कम्पॅनियन'च्या बाजारपेठेचे सध्याचे मूल्य पाचशे डॉलरवर गेले असून, ती दर वर्षी ३६ टक्के दरानं वाढून २०३६पर्यंत ९७२ अब्ज डॉलरपर्यंत जाईल, असा अंदाज आहे. या कृत्रिम सोबतीशी लिखित स्वरूपात संवाद साधता येतो; किंवा थेट बोलताही येते. तो सर्व गोष्टी, म्हणजे आप्तेष्टांच्या वाढदिवसापासून ऑफिसमधील कामापर्यंतच्या अनेक बाबी लक्षात ठेवतो; त्यांची आठवण करून देतो. दिवस सुरू झाल्यापासून रात्री झोपेपर्यंत तो साथ करतो. त्यामुळे त्याचा वापर करणारे वाढताहेत. त्यांपैकी सर्वच जण त्यात आपला जीवनसाथी पाहत नाहीत. मात्र, निराशेनं ग्रस्त असलेले किंवा मानवी नातेसंबंधांपेक्षा तंत्रज्ञानाशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवणं इष्ट मानणारे त्याच्यात आयुष्याचा साथीदार पाहतात. आलिसिया, युरिना, फेइट त्यांपैकीच. आलिसियानं आपल्या साथीदाराला 'होलोग्राम'च्या रूपात म्हणजे प्रकाशकिरणांद्वारे मानवी आकार प्राप्त करून साकारलंय.

युरिनानं त्याचं चित्र साकारलंय. यंत्राला नवरा मानण्याची त्यांची कृती अनैसर्गिक खरी; पण माणसं-माणसांपासून दुरावल्यामुळे, संवाद खुंटल्यामुळे, स्नेहात कृत्रिमपणा आल्यानं आणि यंत्रांवरील अवलंबित्व वाढल्यामुळं निर्माण होत असलेली पोकळी कृत्रिम बुद्धिमत्ता भरून काढत आहे; अशा वेळी दोष कोणाला द्यायचा?

# गुरु वचन

## ध्यान प्रार्थनेचे सर्वोच्च रूप

प्रार्थना ईश्वराशी एकरुप होण्याची प्रभावी पद्धत आहे. लोक विविध प्रार्थना करतात. काही लोक संसारिक वस्तूंसाठी प्रार्थना करतात. उदाहरणार्थ चांगली नोकरी, नवे घरे किंवा नवी कार. काही लोक आरोग्यासाठी प्रार्थना करतात ज्यामुळे ते किंवा त्यांचे कुटूंब सुदृढ व्हावे. काही लोक वैयक्तिक संबंध वृद्धींगत होण्यासाठी प्रार्थना करतात. पण बहुतांश लोक संसारिक वस्तुंसाठीच प्रार्थना करतात. सामान्यपणे जेव्हा आपण प्रार्थना करतो तेव्हा आपण ईश्वराकडे स्वत:साठी काहीतरी मागतो. आपण नेहमी त्या वस्तूंसाठी प्रार्थना करतो, ज्या आपल्यासाठी फायदेशीर ठरतील. त्यावेळी आपली जीवनाबाबत माहिती मर्यादित असते. अनेकदा आपण अशा गोष्टींसाठी प्रार्थना करु शकतो ज्या आपल्यासाठी फायदेशीर आहेत पण अखेरीस त्या गोष्टी आपल्यासाठी फायदेशीर ठरत नाही. आपण प्रार्थना करुन एखादी वस्तू मिळवू शकतो पण मोठ्या काळानंतर ती आपल्या लायक नसल्याचे दिसते.

म्हणून मी समजतो की, प्रार्थनाची योग्य पद्धत ईश्वराची इच्छा आपल्या जीवनात उतरवणे. म्हणून अनेक धर्मात म्हण आहे की, माझी इच्छा नव्हे तुमची इच्छा पूर्ण होवो. का? कारण ईश्वराला आपल्या जीवनात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची माहिती असते. तो जाणतो की, खरंच आपल्यासाठी काय सर्वोत्तम आहे. उदाहरणार्थ आपण विचार करूतो की, १ कोटीची लॉटरी लागली तर खुप बरे होईल.

पण आपण हे लक्षात घेत नाही की, एवढे पैसे मिळाल्यानंतर दोन गोष्टी होऊ शकतात. आपण मोठ–मोठ्या वस्तूंच्या खरेदीत इतके गुरफटतो की आपण ईश्वराला विसरतो किंवा आपल्या सर्व मित्रांना पैशात वाटा हवा असतो. आपण पैसे न देण्यामुळे मैत्री तुटू शकते व आपण एकटे पडू शकतो म्हणून आपल्यासाठी काय चांगले आहे? हे आपण खरंच समजून घेत नाही. आपल्या मर्यादित दृष्टीकोनामुळे आपण ते मागतो जे आपल्या विचारानुसार चांगले आहे पण जर आपण हे ईश्वरावर सोडले की आपल्यासाठी जे सर्वोत्तम असेल ते त्याने द्यावा तेव्हा आपण खरी प्रार्थना करतो.

प्रार्थनेचे सर्वोच्च रूप म्हणजे ईश्वराला जाणणे व ईश्वरात एकरुप होणे. ईश्वरास जाणण्याची प्रार्थना म्हणजे त्या शक्तीचे आवाहन करणे जिने आपली निर्मिती केली. जेव्हा ईश्वरास जाणण्याची इच्छा आपल्या मनात निर्माण होते तेव्हा ती एक अविरत प्रार्थना बनते, जी तोवर थांबत नाही जोवर आपण ईश्वरास प्राप्त करून घेत नाही.

ईश्वर जाणण्याच्या अशाच प्रार्थनेला ध्यान (मेडिटेशन) किंवा योगा म्हटले जाते. ध्यान प्रार्थनेचे सर्वोच्च रुप आहे. प्रार्थनेत आपण ईश्वराला सांगतो की, आपणास काय हवे आहे. ध्यानात आपण ईश्वरास ऐकतो की, त्यास काय हवे आहे.

ध्यान म्हणजे शांत बसणे नाही. या दरम्यान आपले संपूर्ण लक्ष ईश्वरास शोधत असते. आपण जीवनातील सर्व लक्ष्य विसरुन ईश्वराची दया आपल्या कशी प्रवेश करेल? या तयारीने बसतो. ध्यान यांत्रिक काम नाही. तथापि, काही प्रार्थना यांत्रिक असतात. या ईश्वरात लीन होण्यासाठी आपले मन, व आत्म्यात उठणारी तीव्र इच्छा आणि व्याकुळ अवस्था आहे.

# उपदेशकथा

## मीच बोलत होतो

स्वामी विवेकानंदांची ही विद्यार्थी असतानाची कथा. त्यांचे लहानपणीचे नाव होते नरेंद्र. एकदा वर्गामध्ये दोन तासांच्या मधल्या वेळात नरेंद्राने मित्रांना असेच काहीतरी सांगायला सुरुवात केली. पुढच्या तासाच्या शिक्षकांनी दरम्यान फळ्यावर शिकवायला प्रारंभ केला. थोड्या वेळाने त्यांना मुलांच्या कुजबुजण्याचा आणि हसण्याचा आवाज आला. त्यांनी चिडून मागे पाहिले आणि कोण बोलत होते ते कळावे म्हणून सांग मी काय शिकवित होतो ते असे प्रत्येकाला विचारण्यास सुरुवात केली. कोणाचेच लक्ष नसल्याने त्यांना काहीच सांगता येईना. नरेंद्राची पाळी आली तेव्हा त्याने मात्र गुरुजी काय शिकवत होते ते बरोबर सांगितले. कारण एकीकडे तो बोलत असला तरी दुसरीकडे त्याचे लक्ष शिकवण्याकडे नीट होते. पण असे झाले, तरी कोण नेमके बोलत होते ते गुरुजींना समजेना. त्यांनी सांगितले त्यावर गुरुजींचा विश्वास बसणे शक्यच नव्हते, कारण एकट्या नरेंद्रानेच बरोबर उत्तर दिले होते. शिक्षा म्हणून गुरुजींना नरेंद्र सोडून सर्वांना बाकावर उभे राहण्यास फर्मावले, पण सर्वांबरोबर नरेंद्रही उभा राहिला. त्याला खाली बसायला सांगितल्यावर तो गुरुजींना म्हणाला, नाही गुरुजी मी पण बाकावर उभे राहायला हवे, कारण मीच त्यांच्याशी बोलत होतो.

कथा उपदेश : प्रामाणिकपणाचा गुण लहानपणापासून बाळगायला हवा.

# संस्कृत सुभाषित

विद्या नसे ज्या तप दान नाही । न ज्या गुण ज्ञान न शील काही
।। न धर्म भूमिप्रति भारकारी । पशूच ते मानव देहधारी ।।

अर्थ : त्याग, श्रीगुरुंची कृपा, सत्यवाणी, शौर्य, अंत:करणाची निश्चलता व निरोगीपणा अशा गुणांची येथे प्रशंसा केली आहे.

# दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०३९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | | | 6 | 5 | 1 | | |
| 9 | | 4 | | | 1 | 8 | 5 | |
| 5 | | 1 | | | 9 | | 6 | 2 |
| 4 | 5 | | 7 | | | | | |
| | | 9 | | | | 7 | | |
| | | | | | 6 | | 4 | 8 |
| 6 | 4 | | 9 | | | 2 | | 7 |
| | 1 | 8 | 6 | | | 9 | | 5 |
| | | 5 | 1 | 2 | | | | 4 |

## : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०३८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 7 | 9 | 8 | 3 | 5 | 1 | 6 | 2 |
| 6 | 8 | 5 | 1 | 2 | 4 | 7 | 9 | 3 |
| 2 | 1 | 3 | 7 | 6 | 9 | 4 | 8 | 5 |
| 7 | 6 | 4 | 5 | 8 | 2 | 9 | 3 | 1 |
| 3 | 9 | 2 | 4 | 1 | 6 | 5 | 7 | 8 |
| 1 | 5 | 8 | 9 | 7 | 3 | 6 | 2 | 4 |
| 8 | 4 | 6 | 3 | 5 | 7 | 2 | 1 | 9 |
| 5 | 3 | 7 | 2 | 9 | 1 | 8 | 4 | 6 |
| 9 | 2 | 1 | 6 | 4 | 8 | 3 | 5 | 7 |

# इतिहासात आजचा दिवस

## आंतरराष्ट्रीय

- २००७ – मलेशियाच्या प्रमुख राष्ट्रीय महामार्गावर एक बस उलटून १९ प्रवासी ठार झाले.
- २००८ – अमेरिकेचा दिग्गज जलतरणपटू मायकल फेल्प्सने जागतिक विक्रम नोंदवित सर्वांत कमी वेळेत पुरुषांच्या २०० मीटर बटरफ्लाय स्पर्धा चार गुणांसह तर २०० मीटर फ्रीस्टाइल रिले स्पर्धा जिंकून आपल्या ऑलिम्पिक कारकीर्दीतील १० वे व ११ वे सुवर्ण पदक जिंकले. या विक्रमामुळे त्याची जागतिक ऑलिम्पिकच्या जागतिक इतिहासात नोंद झाली.

## राष्ट्रीय

- २००६ – तिरुनेलवेलीचा १५ वर्षीय चंद्रशेखर भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) त एम. टेक. अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवणारा सर्वात कमी वयाचा विद्यार्थी ठरला. चंद्रशेखरने एम. टेक. प्रवेश परीक्षेत ९९.३२ गुण पटकावून प्रवेश मिळवला.


## जन्म

- १८९० – त्र्यंबक बापूजी ठोंबरे ऊर्फ बालकवी.
- १८९८ – प्र. के. अत्रे, मराठीतील विद्वान, अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे प्रसिद्ध लेखक आचार्य.

## निधन

- १७९५ – अहिल्याबाई होळकर,राजकारणामध्ये चतुर असलेली व तपस्वी वृत्तीची थोर साध्वी.
- १९१० – फ्लॉरेन्स नाइटिंगेल, जगातील आद्यपरिचारिका.
- १९८० – पु. भा. भावे, मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक.
- १९८८ – गजानन जहागीरदार, मराठीतील श्रेष्ठ अभिनेते व फिल्म इन्स्टिट्युटचे पहिले संचालक.

# : SMS :



2. Student wale

Teacher : Batao bijli kaise banti hai?

Pappu: Ma'am bill bharne se.

# हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २६.४ | २३.५ |
| अहमदनगर | २९.५ | २१.७ |
| अकोला | ३१.२ | २५ |
| अमरावती | ३०.३ | २४.७ |
| बीड | ३७.४ | २४.९ |
| भंडारा | ३२.७ | २४.९ |
| बुलढाणा | ३८.१ | २६.२ |
| चंद्रपूर | ३७.५ | २५.३ |
| चेन्नई | ४१.४ | २९.९ |
| नवी दिल्ली | ४१ | ३४ |
| धुळे | ३२.२ | २५ |
| गोंदिया | ३१.४ | २४.६ |
| जळगाव | २९.२ | २५ |
| कोल्हापूर | २६.८ | २१.३ |
| लातूर | ३२.७ | २२.२ |
| मुंबई | ३२.१ | २७ |
| नागपूर | ३२.५ | २३.८ |
| नांदेड | ३४.५ | २४.१ |
| नंदूरबार | २५.८ | २४.९ |
| नाशिक | २५.६ | २२.२ |
| पुणे | २५.६ | २१.२ |
| पंढरपूर | ३४.५ | २३.६ |
| सातारा | २८.७ | २०.५ |
| सांगली | ३१.८ | २१.६ |
| सोलापूर | ३४.६ | २४.२ |
| वर्धा | ३४ | २५ |



# आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर कौटुंबिक उत्साह, गोड वार्तालाप व आनंदाच्या गाठीभेटी यातून उत्साह संचरेल.

**तुळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण बोलण्यातील कटुता अहंकाररहित शब्दांनी टाळण्याचा प्रयत्न करा.

**वृषभ :** शुभ रंग: नीळा, अनुकूल दिशा : पश्चिम स्वत:ची तब्येत योग्य साथ देत असेल तर काही नवे संकल्प करणे हितकारक ठरेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण वैवाहिक साथीदाराचा अगदी पत्नीचाही सल्ला अजिबात विसरू नका.

**मिथुन :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा : पश्चिम व्यावसायिक प्रश्नामध्ये यश मिळेल. कोणाशीही वादविवाद वाढविणे नुकसानकारक ठरेल.

**धनु :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा : उत्तर ताणतणावामुळे आजारपण उद्भवणार नाही याची काळजी घेणे.

**कर्क :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम खाण्यापिण्याची बंधने विसरू नका. कामकाजासंबंधी आपला शब्द प्रमाण मानला जाईल.

**मकर :** शुभ रंग: पिवळा, अनुकूल दिशा : पश्चिम वेळ देणे अत्यंत हितकारक ठरेल. ठरविलेले कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध रहा.


**सिंह :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम शेजाऱ्याशी संबंध सलोख्याचे होतील. नुसते गप्पाष्टकांत अडकणाऱ्या मैत्रिणीपासून सावध रहा.

**कुंभ :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा : दक्षिण आपले हिशेब चोख ठेवावेत. संशयाला कोठेही जागा राहणार नाही असे बोलणे व कृती ठेवावी.

**कन्या :** शुभ रंग: केसरी, अनुकूल दिशा : उत्तर खेळात प्रविण्य मिळेल. लहान लहान कोर्सेस आपले व्यक्तिमत्व फुलविणारे ठरतील.

**मीन :** शुभ रंग: केसरी, अनुकूल दिशा : दक्षिण काही सूचक स्वप्ने भविष्याचा कानोसा देणारी ठरतील. परदेश प्रवासाचे स्वप्न पुरे होईल.

# 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०३९



**आडवे शब्द**

१. धंदा, उद्योग
५. खिशाला खार
९. दिवाळीतील बळीराजाचा दिवस
११. श्रीकृष्णाचे एक नाव
१४. प्रत्येक वर्षी
१६. हिंमत
१८. निमित्त
१९. लहान बाळ
२०. शुभ्र, पांढरा
२२. मातीच्या वासाचे
२४. वरपांगी
२५. अंत:करण
२६. अरण्य
२८. न दबणारे, कडक
२९. दुर्दशा
३०. कंबर
३१. अमृत
३४. समोरासमोरची चकमक
३५. वंदन
३६. नारळाचे झाड
३७. कल्पना मूर्त रूपात आणणारा
३८. उमर
४०. अनावश्यक, नको असता
४२. मयूर
४४. मोठा नगारा
४६. टोळीचा प्रमुख
४८. दुष्ट
४९. पालक पित्यावरून श्रीकृष्णाचे एक नाव
५०. सत्व
५२. तोफगाडी
५४. गणपतीची आई
५५. अर्धांगवायू
५७. लोकोत्तर पुरुष
५९. वाईट सवय
६०. च्या शिवाय
६२. धान्यघर
६५. शेराला कधीतरी भेटणारा
६६. तमाशातील सोंगाड्या
६७. तेज, कांती
६९. भुंगा, भ्रमर
७०. भारवाहक
७१. घाई, त्वरा
७३. जानकी
७४. देहाची खोळ
७६. कळलाव्या मुनी
७८. सत्तेचा खेळ
८०. शिवरायांच्या नंतर ही उपाधी द्यावी असा नेता अद्याप दुर्मिळच!
८१. जमीन
८२.जखमेवरील औषध
८३. केळ्याची गोड जात

**उभे शब्द**

२. वस्ती
३. जेव्हा
४. चाहूल, पावलांचा आवाज
६. राजाची कचेरी, राजसभा
७. अनेकांना उकडीचे प्रिय!
८. भीती
९. पदर
१०. बोलणे, वाणी
१२. संधी
१३. उन्हाची तीव्रता
१५. निर्मितीसाठी आवश्यक घटक
१६. प्रवासात सांभाळा!
१७. च्या सह
२१. चटकन
२३. धनुष्याच्या दोरीचा आवाज
२५. कामदेव
२७. अभिनेत्री
२९. बेफाम
३२. धैर्य, साहस
३३. उगीच, अकारण
३४. तात्पर्य
३९. हद्द
४१. साठ मिनिटे
४२. किंमत
४३. पत्रातील वि.वि.
४४. अडत्या
४५. धनी
४७. उंबरठा
४८. छोटा दगड
५०. न्यूनता
५१. षट, अर्धा डझन
५३. समुद्राच्या लाटांचा आवाज
५४. हरिणाचे पिल्लू
५६. मार्गक्रमण
५८. नको असलेला
६१. बाई
६३. भटक्या, गोसावी
६४. बहुरूपी
६६. करून सवरून वेगळा राहणारा
६८. वेदना
७२. अंकुर
७४. भावकी
७५. हुक्की, लहर
७७. दीर्घ श्वास
७९. गोडी


**जम्बो शब्दकोडे क्र. १०३८ चे उत्तर**

आडवे उत्तर १.जुगार ४.खजिना ६.दैत्य ७.मंगळागौर १०.लवकर १२.बाजू १३.माया १४.जय १६.वान १७.रखुमाई १८.बोटभर २०.नकलनवीस २२.टकनक २४.बातमीदार २६.डबा २८.रजक ३०.कंद ३१.सण ३२.सरणे ३४.न्यायालय ३६.सराईत ३८.भरीत ४०.जग ४२.तत्पर ४३.नटराज ४६.धमाल ४७.तया ४९.रबर ५१.बक ५३.कंपन ५५.चमत्कार ५७.खतरनाक ५९.यदा ६१.पाना ६२.रणतुंबळ ६३.वरण ६४.नख ६६.जंगली ६९.खापरपणजी ७३.वातड ७४.मालक ७६.वर्तन ७७.कथानक ७८.गाणे ७९.वितरण ८०.वानरी ८१.वडापाव

उभे उत्तर : १.गालबोट ३.रव ४.खर ५.नालायक ६.दैववान ७.मंजूर ८.गौराई ९.रया ११.कदर करणे १२.राजस १४.जनककन्या १५.जलद १६.नवीन १७अ.खुषीत १८.बोकड १९.भट २०अ.लड्डु २१.तोरणमरण २३.मज २४.बादरायण २५.दास २७.बासरी २९.पायजमा ३०.कंस ३३.रतन ३५.यान ३७.ततपप ३८.भटका ३९.तारा ४१.गलबत ४४.टणत्कार ४५.जर ४६.धर ४८.याचना ५०.बलाबल ५२.करवली ५३.कंकण ५४.नयन ५६.रणरण ५८.नार ६०.दाखल होणे ६१.पारखा ६५.घोर ६६.जंत ६७.गडकरी ६८.काक ७०.पर्वत ७१.पठण ७२.जीवन ७३.वानवा ७४.मानव ७५.लकडा ७८.गाव

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे




## एएम/एनएस इंडियाने पुढील पिढीतील हेवी प्लेट सोल्यूशन्स केले सादर

पुणे : दैनिक संध्या

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/एनएस इंडिया) ने आज भारतातील वाढत्या पायाभूत सुविधा, उत्पादन, बांधकाम, ऊर्जा, वाहतूक आणि अवजड अभियांत्रिकी क्षेत्रांसाठी विकसित केलेल्या स्ट्रक्ट्रोमॅक्स आणि वेल्डस्टार या दोन नव्या हेवी स्टील प्लेट ब्रँडचे लॉन्चिंग जाहीर केले.गुजरातमधील हजीरा येथील एएम/एनएस इंडियाच्या अत्याधुनिक प्लेट मिल प्रकल्पात विकसित करण्यात आलेली ही नवीन उत्पादने प्रगत रोलिंग आणि उष्णता उपचार तंत्रज्ञानासोबत अचूक धातुकर्म प्रक्रिया आणि गुणवत्तेचे कठोर नियंत्रण यांचा समन्वय साधतात. स्ट्रक्ट्रोमॅक्स हे थर्मो-मेकॅनिकल कंट्रोल्ड प्रोसेसिंग (टीएमसीपी) तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित करण्यात आले आहे. पूल, उंच इमारती, समुद्रातील प्रकल्प, रेल्वे, पवन ऊर्जा प्रकल्प तसेच इतर अवजड क्षेत्रांमध्ये त्याचा वापर करता येतो.या स्टील प्लेटमध्ये उत्कृष्ट वेल्डिंग क्षमता, मजबुती, भार सहन करण्याची क्षमता, गंजरोधकता आणि फॅब्रिकेशन कार्यक्षमता आहे. त्यामुळे अभियंते आणि प्रकल्प विकासकांना आव्हानात्मक कार्यप्रणाली किंवा हवामानाच्या परिस्थितीतही स्थिर आणि टिकाऊ संरचना उभारण्यास मदत होते. वेल्डस्टार ही अतिउच्च सामर्थ्याच्या स्टील प्लेटची श्रेणी आहे. यामुळे अभियंत्यांना सुरक्षितता आणि टिकाऊपणाशी कोणतीही तडजोड न करता संरचनांचे वजन कमी करण्यास, भार वाहून नेण्याची क्षमता वाढविण्यास, इंधनाची बचत करण्यास आणि संपूर्ण कार्यकाळातील खर्च कमी करण्यास मदत होते.वेल्डस्टार प्रामुख्याने क्रेन, खाणकामासाठी लागणारी उपकरणे, वाहतूक व्यवस्था, समुद्रातील प्रकल्प तसेच इतर महत्त्वपूर्ण वापरांसाठी विकसित करण्यात आले आहे. त्यामुळे दीर्घकाळातील संचालनाचा खर्च कमी करण्यास मदत होते.

## एचपी ओम्नीपॅड १२ भारतात दाखल



पुणे : दैनिक संध्या

एचपी इंडियाने भारतात एचपी ओम्नीपॅड १२ उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. विद्यार्थी, प्रथमच संगणकीय उपकरण वापरणारे, सूक्ष्म व लघु उद्योग आणि सतत प्रवास करणाऱ्या व्यावसायिकांच्या गरजा लक्षात घेऊन हे उपकरण तयार करण्यात आले आहे. लॅपटॉपसारखी उत्पादकता आणि टॅब्लेटसारखी लवचिकता देणारे हे उपकरण शिक्षण, काम आणि मनोरंजनासाठी वापरता येते. काढता येण्याजोग्या कीबोर्डमुळे वापरकर्त्यांना टॅब्लेट आणि लॅपटॉप अशा दोन्ही पद्धतीने उपकरणाचा वापर करता येतो. क्वालकॉम स्नॅपड्रॅगन प्रोसेसर आणि अँड्रॉइड १६ प्रणालीमुळे दैनंदिन संगणकीय कामांसाठी सहज आणि प्रतिसाद देणारा अनुभव मिळतो. एचपी इंडियाच्या वैयक्तिक संगणक प्रणाली विभागाचे वरिष्ठ संचालक विनीत गेहानी म्हणाले, भारतातील विविध वापरकर्त्यांच्या गरजा लक्षात घेऊन एचपी ओम्नीपॅड १२ तयार करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षण, एमएसएमईचे दैनंदिन कामकाज आणि डिजिटल संधींचा स्वीकार करणाऱ्या नव्या वापरकर्त्यांसाठी हे उपकरण उपयुक्त ठरेल.

घोडगंगा साखर कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी त्रुटींची पूर्तता करून

# ‘एनएसडीसी’कडे कर्जमागणीचा फेर प्रस्ताव सादर करा

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सूचना

■ पुणे (दै. संध्या)

रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखाना हा शिरूर तालुक्याच्या अर्थव्यवस्थेची महत्त्वाची आधारवाहिनी असून, कारखान्यावर अवलंबून असलेल्या हजारो शेतकरी, ऊस उत्पादक, कामगार, लघुउद्योजक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या हितासाठी कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी. कारखान्याला आवश्यक अर्थसहाय्य मिळण्यासाठी 'एनएसडीसी'कडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील त्रुटी तातडीने पूर्ण करून कर्ज मागणीचा प्रस्ताव नव्याने सादर करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू करण्याबाबत आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, शिरूरचे आमदार ज्ञानेश्वर कटके, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सहकार आयुक्त व निबंधक दिपक तावरे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, राजेंद्र कोरेकर, रवी काळे, सुधीर फराटे, दादा पाटील फराटे, शशिकांत दसगुडे, राजेंद्र जगदाळे, बाळासाहेब नागवडे, स्वप्निल ढमढेरे, स्वप्नील गायकवाड, श्रीनिवास घाडगे, राजेंद्र गदादे, बाळासाहेब फराटे, महेश ढमढेरे, सोपानराव गवारी, शरदराव साठे, दादासाहेब कोळपे, कुंडलिकराव शितोळे, विरेंद्र शेलार यांच्यासह संबंधित अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे कार्यक्षेत्र संपूर्ण शिरूर तालुक्यात असून, तालुक्यातील ९८ गावांचा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात समावेश आहे. कारखान्याचे सुमारे १९ हजार सभासद आहेत. गेल्या तीन गळीत हंगामांपासून कारखाना बंद असल्याने त्यावर अवलंबून



असलेल्या शेतकरी, कामगार आणि इतर घटकांवर त्याचा परिणाम होत आहे.

कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्थसहाय्याकरिता एनएसडीसीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मात्र, प्रस्तावात काही त्रुटी आढळल्याने तो परत आला आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी प्रस्तावातील सर्व त्रुटींची तातडीने पूर्तता करून सुधारित कर्ज मागणीचा प्रस्ताव नव्याने सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. घोडगंगा कारखाना हा केवळ एक साखर कारखाना नसून शिरूर तालुक्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. कारखाना सुरू झाल्यास ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार असून, कारखान्यातील कामगार, वाहतूकदार, लघुउद्योजक तसेच कारखान्याशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जोडलेल्या हजारो कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या हिताचा विचार करून कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक ती सर्व पावले वेगाने उचलावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कारखाना सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींचा आढावा घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि कारखाना व्यवस्थापनाची बैठक त्वरित आयोजित करावी, अशा सूचनाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी दिल्या.

शिरूर तालुक्यातील शेतकरी आणि कारखान्यावर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांना दिलासा देण्यासाठी घोडगंगा साखर कारखाना पुन्हा कार्यान्वित करण्यास शासनाचे प्राधान्य राहणार असून, त्यासाठी प्रस्तावातील त्रुटी दूर करून अर्थसहाय्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येणार आहे.

## एअरटेल आयपीटीव्हीची स्वातंत्र्यदिन विशेष वॉचलिस्ट

■ पुणे (दै. संध्या)

या स्वातंत्र्यदिनी एअरटेल आणि नेटफ्लिक्सने धैर्य, शौर्य आणि त्यागाची प्रेरणादायी कहाणी देशभरातील कृतज्ञतेच्या भावनेशी जोडण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. भारतीय हवाई दलाच्या गोल्डन ॲरोज स्क्वॉड्रनने १९९९ च्या कारगिल युद्धात बजावलेल्या भूमिकेपासून प्रेरणा घेतलेले ‘ऑपरेशन सफेद सागर’ हे एअरटेल आयपीटीव्हीच्या स्वातंत्र्यदिन विशेष वॉचलिस्टचे प्रमुख आकर्षण ठरले आहे. या माध्यमातून संघर्षाच्या अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत सेवा बजावणाऱ्या हवाई योद्ध्यांचे धैर्य, अचूकता आणि त्याग प्रेक्षकांना जवळून अनुभवता येणार आहे. ‘एक देश, दहा लाख धन्यवाद’ या संकल्पनेतून #MillionThankYou उपक्रम राबविण्यात येत असून, एअरटेल आणि नेटफ्लिक्सने देशभरातील नागरिकांना भारतीय हवाई दलाचा सन्मान करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचे आवाहन केले आहे. नेटफ्लिक्स ‘ऑपरेशन सफेद सागर’ची कहाणी संपूर्ण भारतातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत आहे, तर एअरटेल देशवासीयांना सामूहिक संदेशातून आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून एअरटेलने १० राज्यांमधील ११ शहरांमध्ये ‘थँक यू स्टेशन्स’ उभारली आहेत. या केंद्रांपर्यंत पोहोचणे शक्य नसलेल्या नागरिकांनाही एअरटेलच्या विशेष व्हॉट्सॲप सुविधेद्वारे या देशव्यापी कृतज्ञता उपक्रमात सहभागी होता येणार आहे. कृतज्ञतेचा संदेश शेअर करून #MillionThankYouचा भाग होण्यासाठी वापरकर्ते +९१ ९२८९५ ५९४०३ या क्रमांकावर व्हॉट्सॲप संदेश पाठवू शकतात. ‘ऑपरेशन सफेद सागर’हा चित्रपटही ऑनलाइन पाहता येणार आहे.

‘ऑपरेशन सफेद सागर’मुळे ही कहाणी केवळ मनोरंजनापुरती मर्यादित न राहता, देशाला आपल्या इतिहासातील एका महत्त्वपूर्ण पर्वाकडे पुन्हा पाहण्याची आणि त्या काळात देशसेवा बजावणाऱ्या जवानांच्या योगदानाची दखल घेण्याची संधी मिळते. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने एअरटेल आयपीटीव्हीने धैर्य, त्याग आणि जिद्दीच्या आणखी सात कहाण्यांचा समावेश आपल्या विशेष वॉचलिस्टमध्ये केला आहे.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ढोल-ताशा पथकांना सरावासाठी जागा व परवानगी उपलब्ध करून द्यावी – महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे

■ पुणे (दै. संध्या)

पुण्याची ऐतिहासिक व वैभवशाली गणेशोत्सव परंपरा जपणाऱ्या ढोल-ताशा पथकांना आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सरावासाठी आवश्यक जागा तसेच प्रशासकीय परवानग्या तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी पुणे महापालिकेच्या महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

पुण्याचा गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून पुण्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरेचा अभिमान आहे. ढोल-ताशा पथके या परंपरेचा अविभाज्य भाग असून, हजारो युवक-युवती शिस्त, संस्कार आणि सांघिक भावनेतून या लोककलेचे जतन व संवर्धन करीत आहेत. “पुण्याची ही सांस्कृतिक ओळख पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ढोल-ताशा पथकांना प्रोत्साहन आणि आवश्यक सुविधा मिळणे गरजेचे आहे,” असे महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी सांगितले.

महापालिका प्रशासनाने नदीपात्र, महापालिकेची मोकळी मैदाने तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही



अशा योग्य ठिकाणी ढोल-ताशा पथकांना सरावासाठी प्राधान्याने जागा उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना महापौरांनी केली आहे. तसेच विविध विभागांकडून स्वतंत्र परवानग्या घेण्यासाठी पथकांना अडचणी येऊ नयेत यासाठी ‘सिंगल विंडो’ प्रणाली किंवा सुलभ ऑनलाइन/ऑफलाइन परवानगी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. सरावाच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार प्रकाशव्यवस्था, स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची तात्पुरती सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही प्रशासनाने कार्यवाही करावी. ढोल-ताशा सरावादरम्यान ध्वनीप्रदूषण, वेळेची मर्यादा आणि वाहतुकीसंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन होण्यासाठी महापालिका प्रशासनाने पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून स्पष्ट मार्गदर्शक सूचना निश्चित कराव्यात. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही आणि त्याचवेळी सांस्कृतिक परंपरेलाही प्रोत्साहन मिळेल, यामध्ये योग्य समतोल साधणे आवश्यक आहे.

> “पुण्याची सांस्कृतिक ओळख असलेल्या ढोल-ताशा परंपरेला प्रोत्साहन देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नियमांचे पालन करून सराव करणाऱ्या पथकांना प्रशासनाकडून अडथळे न येता आवश्यक सुविधा आणि परवानगी मिळावी. यासाठी संबंधित विभागांना तातडीने योग्य ते निर्देश देण्यात यावेत,” अशी भूमिका महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी व्यक्त केली.

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील अधिकृत ढोल-ताशा पथकांना सुरक्षित, शिस्तबद्ध आणि नागरिकांना कोणतीही गैरसोय न होईल अशा पद्धतीने सरावाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी केली आहे.

भारताच्या संरक्षण, एरोस्पेस आणि विमानतळ क्षेत्रासाठी

## ‘एडेक्स + एअरपोर्ट एक्स्पो २०२६’चे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)

AEDEX AEROSPACE & DEFENCE EXPO + Airport Expo

■ नवी दिल्लीत १० ते १२ सप्टेंबरदरम्यान धोरणकर्ते, उद्योगपती आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्या एकाच मंचावर

भारतातील संरक्षण उत्पादन, एरोस्पेस, विमानचालन आणि विमानतळ पायाभूत सुविधा क्षेत्रातील वाढते नेतृत्व अधोरेखित करणारा ‘एडेक्स + एअरपोर्ट एक्स्पो २०२६’ हा भव्य आंतरराष्ट्रीय कार्यक्रम १० ते १२ सप्टेंबर २०२६ दरम्यान नवी दिल्लीतील यशोभूमी, इंडिया इंटरनॅशनल कन्व्हेन्शन अँड एक्स्पो सेंटर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या तीन दिवसीय कार्यक्रमात धोरणकर्ते, संरक्षण उत्पादक, एरोस्पेस कंपन्या, विमानतळ विकासक, तंत्रज्ञान पुरवठादार, संशोधन संस्था, गुंतवणूकदार आणि जागतिक उद्योगपती एकाच मंचावर येणार आहेत. या माध्यमातून संरक्षण, एरोस्पेस, विमानचालन आणि विमानतळ पायाभूत सुविधा क्षेत्रात भारताचे जागतिक स्थान अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

‘एडेक्स + एअरपोर्ट’ या अंतर्गत आयोजित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदांचे उद्दिष्ट अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रदर्शन, धोरणात्मक भागीदारीला चालना आणि नव्या व्यावसायिक संधी निर्माण करणे हे आहे. संरक्षण उत्पादक, सरकारी संस्था, सशस्त्र दल, संशोधन संस्था, तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा पुरवठादार तसेच जागतिक गुंतवणूकदारांसाठी हे महत्त्वपूर्ण व्यावसायिक आणि तंत्रज्ञान व्यासपीठ ठरणार आहे.

या कार्यक्रमाला नागरी विमान वाहतूक मंत्रालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, संरक्षण संशोधन व विकास संस्था, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय आणि वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषद यांचे पाठबळ मिळाले आहे. तसेच ‘मेक इन इंडिया’ आणि ‘स्टार्टअप इंडिया’ या उपक्रमांसह एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया, ड्रोन फेडरेशन ऑफ इंडिया आणि एअर कार्गो फोरम इंडिया या औद्योगिक संघटनांचाही सहभाग आहे.

भारताचे एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्र सध्या मोठ्या परिवर्तनाच्या टप्प्यातून जात आहे. ‘मेक इन इंडिया’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ यांसारख्या उपक्रमांमुळे स्वदेशी उत्पादन, तांत्रिक नवोपक्रम, खासगी क्षेत्राचा सहभाग आणि संरक्षण उत्पादनांच्या निर्यातीला चालना मिळत आहे. धोरणात्मक सुधारणा, वाढता भांडवली खर्च आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे भारतीय एरोस्पेस आणि संरक्षण बाजारपेठ २०३० पर्यंत ७० अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर ‘एडेक्स + एअरपोर्ट एक्स्पो २०२६’ हे देशांतर्गत तसेच जागतिक उद्योगांसाठी गुंतवणूक, सहकार्य आणि तंत्रज्ञानाच्या नव्या संधी उपलब्ध करून देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

*सोसायटी ऑफ इंडियन एरोस्पेस टेक्नॉलॉजीज अँड इंडस्ट्रीजचे माजी मानद अध्यक्ष आणि हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडचे माजी अध्यक्ष डॉ. सी. जी. कृष्णदास नायर म्हणाले, “एसआयएटीआय आणि टॅफकॉनद्वारे आयोजित ‘एडेक्स + एअरपोर्ट एक्स्पो २०२६’ हे प्रदर्शन एरोस्पेस, संरक्षण आणि विमान वाहतूक क्षेत्रातील नवोपक्रमात भारताचे जागतिक स्थान मजबूत करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देईल. या महत्त्वपूर्ण औद्योगिक व्यासपीठावर सहभागी होण्यासाठी मी उद्योग क्षेत्रातील सर्व भागधारकांना आमंत्रित करतो.”*

## सीजीटीएमएसईअंतर्गत सुंदरम फायनान्सची सदस्य कर्जदाता संस्था म्हणून नोंदणी

तारणाशिवाय सूक्ष्म व लघु उद्योगांना कर्जपुरवठ्याचा मार्ग मोकळा; व्यवसाय विस्तार आणि रोजगारनिर्मितीला मिळणार चालना

■ पुणे (दै. संध्या)

सुंदरम फायनान्स लिमिटेडची सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठीच्या पतहमी निधी न्यासाच्या (सीजीटीएमएसई) अंतर्गत सदस्य कर्जदाता संस्था म्हणून नोंदणी करण्यात आली आहे. या नोंदणीमुळे पात्र सूक्ष्म आणि लघु उद्योगांना सुंदरम फायनान्समार्फत भारत सरकारच्या पतहमीच्या पाठबळासह वित्तपुरवठा उपलब्ध होणार आहे.

सीजीटीएमएसईसोबतच्या या भागीदारीमुळे पुरेसे तारण नसले, तरी व्यवहार्य व्यावसायिक संधी असलेल्या पात्र सूक्ष्म आणि लघु उद्योगांना औपचारिक कर्जसुविधा मिळण्यास मदत होणार आहे. या माध्यमातून व्यवसाय विस्तार, कार्यकारी भांडवलाच्या गरजा आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. याबाबत सुंदरम फायनान्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक राजीव लोचन म्हणाले, “सुंदरम फायनान्समध्ये आमचे ध्येय उद्योग आणि समाजाच्या प्रगतीला सक्षम करून



दीर्घकालीन मूल्य निर्माण करणे हे आहे. सीजीटीएमएसईसोबतच्या सहकार्याद्वारे आम्ही विशेषतः कमी सेवा मिळालेल्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांना जबाबदार आणि सर्वसमावेशक वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहोत.” भारत सरकार आणि भारतीय लघुउद्योग विकास बँकेने (सिडबी) संयुक्तपणे स्थापन केलेली सीजीटीएमएसई योजना सदस्य कर्जदाता संस्थांना पतहमी उपलब्ध करून देत सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी तारणमुक्त संस्थात्मक कर्जाची सुविधा उपलब्ध करून देते. सीजीटीएमएसईचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष सिन्हा म्हणाले, “सदस्य कर्जदाता संस्था म्हणून सुंदरम फायनान्सचा समावेश हा तारणमुक्त संस्थात्मक कर्जाचा विस्तार करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. विश्वासार्ह वित्तीय संस्थांसोबत भागीदारी करून आम्ही सूक्ष्म आणि लघु उद्योगांच्या कर्जव्यवस्थेला अधिक मजबूत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.”

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सीजीटीएमएसईने सुमारे ३.०६ लाख कोटी रुपयांच्या पतहमींना मंजुरी दिली. १९५४ मध्ये स्थापन झालेली सुंदरम फायनान्स ही भारतातील एक प्रमुख वित्तीय संस्था आहे. कंपनी विविध क्षेत्रांतील ग्राहक आणि उद्योगांना वित्तीय सेवा उपलब्ध करून देण्याचे काम करते. सीजीटीएमएसईअंतर्गत सदस्य कर्जदाता संस्था म्हणून झालेल्या नोंदणीमुळे सूक्ष्म आणि लघु उद्योगांना वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या कंपनीच्या प्रयत्नांना आणखी बळ मिळणार आहे.

## फ्रेंडशिप डे निमित्त १०० हून अधिक पोर्शे कार्सचा मुंबईत शानदार ड्राइव्ह

■ पुणे (दै. संध्या)

फ्रेंडशिप डे निमित्त मुंबईत मोटारप्रेम आणि वाहन चालविण्याच्या उत्साहाचे शानदार दर्शन घडले. पोर्शे सेंटर मुंबई – इन्फिनिटी कार्सतर्फे ग्राहकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष ड्राइव्हमध्ये पोर्शेच्या १०० हून अधिक कार्सनी सहभाग घेतला.

पोर्शेच्या एसयूव्ही, स्पोर्ट्स कार्स तसेच विद्युत कार्सचा या ताफ्यात समावेश होता. पोर्शे मालक आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकत्र आणणाऱ्या या उपक्रमातून मैत्री, आपुलकी आणि वाहन चालविण्याची समान आवड यांचा उत्सव साजरा करण्यात आला. या ताफ्याने मुंबईतील कोस्टल रोड आणि मरीन ड्राइव्ह यांसारख्या प्रतिष्ठित मार्गांवरून प्रवास केला.

१०० हून अधिक पोर्शे कार्स एकत्रितपणे शहरातून मार्गक्रमण करत असल्याने मुंबईकरांना आकर्षक दृश्य अनुभवायला मिळाले. या ड्राइव्हमुळे पोर्शे मालकांना



■ मुंबईतील प्रतिष्ठित मार्गांवरून पोर्शे कार्सचा ताफा

■ मालक आणि कुटुंबीयांनी साजरा केला मैत्री व ड्रायव्हिंगचा उत्साह

आपल्या कारमधून मुंबईचा अनुभव घेण्यासोबतच पोर्शे समुदायातील इतर सदस्यांशी संवाद साधण्याची आणि नवीन नाती जोडण्याची संधी मिळाली. या उपक्रमाबद्दल पोर्शे सेंटर मुंबई – इन्फिनिटी कार्सच्या संचालक पूजा चौधरी म्हणाल्या, “फ्रेंडशिप डेने आमच्या पोर्शे समुदायाला एकत्र आणण्याची आणि आमच्या ग्राहकांना जोडणाऱ्या सामायिक आवडीचा उत्सव साजरा करण्याची सुंदर संधी दिली.

# नवनीत एज्युकेशनतर्फे एक लाख भारतीय शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा मोफत परवाना

### देशव्यापी उपक्रमातून शिक्षकांना मोफत कृत्रिम बुद्धिमत्ता साधने, परस्परसंवादी शैक्षणिक सामग्री; आयआयटी गांधीनगरच्या विशेष प्रशिक्षण वर्गासाठीही संधी


■ पुणे (दै. संध्या)

नवनीत एज्युकेशन लिमिटेडने देशभरातील एक लाख शालेय शिक्षकांसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम जाहीर केला आहे. या उपक्रमाअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शिक्षकांना कंपनीच्या प्रमुख कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ‘नवनीत एआय’ प्रणालीचा मोफत वापर करता येणार आहे. राज्य मंडळे, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ तसेच राष्ट्रीय स्तरावरील इतर शिक्षण मंडळांच्या शिक्षकांसाठी ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. पारंपरिक




अध्यापनाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन दैनंदिन अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी या प्रणालीचा उपयोग होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अध्यापन साधनांमुळे शिक्षकांना धड्यांचे अधिक चांगले नियोजन करता येणार असून, प्रशासकीय कामांचा भार कमी करण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी वर्गातील शिकण्याचा अनुभव अधिक रंजक आणि परिणामकारक करण्याची सुविधा मिळणार आहे. या उपक्रमाअंतर्गत शिक्षकांना ‘नवनीत एआय’ प्रणालीचा संपूर्ण वापर करता येणार आहे. त्यातील विविध साधनांच्या मदतीने काही क्षणांत सादरीकरणे, उजळणीसाठी स्मरणपत्रिका आणि विषयनिहाय धड्यांचे नियोजन तयार करता येणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३शी सुसंगत अध्यापनासाठी आवश्यक शैक्षणिक सामग्रीही तयार करता येणार आहे. नवनीतची डिजिटल पुस्तके आणि चित्रफिती परस्परसंवादी शैक्षणिक सामग्रीमध्ये रूपांतरित करण्यासाठी विशेष फलकाची सुविधा देण्यात आली आहे. यामध्ये अनेक भाषांचा पर्याय उपलब्ध आहे. शरीरशास्त्र आणि खगोलशास्त्राशी संबंधित २७ हून अधिक त्रिमितीय नमुने, तसेच गणित आणि विज्ञानासाठी ५७ हून अधिक आभासी अनुकरणे यामध्ये उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना अधिक रंजक पद्धतीने शिकवता यावे यासाठी भूगोल, इंग्रजी, संगीत, संगणक आणि मानसिक स्वास्थ्य अशा विविध विषयांसाठी विशेष अनुप्रयोग उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विशेष खेळांमध्ये आधीपासून तयार केलेले शैक्षणिक खेळ तसेच गरजेनुसार बदल करता येतील अशी प्रारूपेही उपलब्ध आहेत. ‘नवनीत एआय’मध्ये ‘शून्य सूचना अनुभव’ देण्यात आला असून, त्यामुळे शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी स्वतंत्र सूचना-रचना कौशल्य शिकण्याची आवश्यकता भासणार नाही.

## थोडक्यात पण महत्वाचे



### विमानात अनेक तांत्रिक बिघाड

**नवी दिल्ली : दैनिक संध्या**

एअर इंडियाच्या ४ ऑगस्ट रोजी दिल्ली-फुकेट विमानात झालेल्या टर्ब्युलन्सवर नवीन खुलासा झाला आहे. विमानात अनेक तांत्रिक बिघाड झाले होते. विमानाची हायड्रॉलिक प्रणाली तीन वेळा निकामी झाली. ऑटो पायलटही डिस्कनेक्ट झाला होता. यानंतर लगेचच सह-वैमानिकाने मॅन्युअल पद्धतीने विमानाचा ताबा घेतला. विमानाचे अनेक इंडिकेटर स्विच काही काळासाठी बंद झाले होते. यावेळी विमानाला हवेत काही धक्केही बसले. त्यानंतर विमान अचानक तब्बल ३०० फूट खाली आले होते. विमानात १३७ प्रवासी आणि ८ क्रू मेंबर्स होते. या घटनेत १७ जण जखमी झाले. या प्रकरणाची चौकशी एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो (एएआयबी) करत आहे. दरम्यान, फ्रान्सची एजन्सी बीईए आणि एअरबसची पथके मंगळवारी भारतात पोहोचण्याची शक्यता आहे. ज्या ए३२० विमानात बिघाड झाला, ते फ्रान्समध्ये बनवले जाते. त्यामुळे बीईए देखील चौकशीत सहभागी होत आहे. एअरलाइन पायलट्स असोसिएशन ऑफ इंडिया (एएलपीएआय) चे अध्यक्ष कॅप्टन सॅम थॉमस यांच्या मते, हायड्रॉलिक सिस्टीममध्ये बिघाड झाल्यानंतर पायलटने विमानाचे नाक (पुढील भाग) खाली केले. यामुळे विमान सुमारे ३०० फूट खाली आले. अचानक उंची कमी झाल्याने विमानात काही काळ निगेटिव्ह-जी सारखी स्थिती निर्माण झाली. यामुळे सीट बेल्ट न लावलेले प्रवासी आणि क्रू सदस्य वर उडून आदळले. काही लोक छताला आणि ओव्हरहेड बिनला धडकले आणि जखमी झाले. कॅप्टन थॉमस म्हणाले की, अशा स्थितीत विमान स्थिर करण्यासाठी कधीकधी यापेक्षाही जास्त उंची कमी करावी लागू शकते. त्यांनी वैमानिकांच्या त्वरित कारवाईला महत्त्वाचे म्हटले.

### भूकंपाचे आतापर्यंत २०० बळी

**बोगोटा : दैनिक संध्या**

दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया देशात सोमवारी रात्री आलेल्या ७.४ तीव्रतेच्या भूकंपात आतापर्यंत २०० जणांचा मृत्यू झाला असून ८०० जण जखमी झाल्याची माहिती आहे. अधिकाऱ्यांच्या मते, देशभरात ८६ इमारती कोसळल्या, तर १,५०० हून अधिक घरांचे नुकसान झाले आहे. १८ आरोग्य केंद्रे आणि ५२ शाळांनाही नुकसान झाले आहे. याशिवाय ७ विमानतळांवरील काम थांबवण्यात आले आहे. पाच शहरांमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. राष्ट्रपतींनी आपत्कालीन समितीची बैठक बोलावून मदत आणि बचाव कार्यावर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. एकट्या पेरेरा शहरात १०० जणांचा मृत्यू झाला आहे. सुमारे ५ लाख लोकसंख्या असलेले हे शहर भूकंपाच्या केंद्रापासून ६४ किलोमीटरपेक्षा कमी अंतरावर आहे. राजधानी बोगोटासह अनेक शहरांमध्येही तीव्र धक्के जाणवले. खबरदारी म्हणून लोक इमारतींमधून बाहेर पडून रस्त्यावर आले. अमेरिकन भूगर्भीय सर्वेक्षणनुसार, भूकंप सोमवारी सकाळी ७:३४ वाजता आला. याचे केंद्र चोको परिसरात सॅन जोसे डेल पालमारजवळ होते. भूकंपाची खोली १०७ किलोमीटर होती.

स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मध्ये नाविण्यपुर्ण उपक्रमासाठी
भारतात प्रथम पुरस्कार प्राप्त नगरपरिषद
स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये भारतात प्रथम क्रमांक प्राप्त नगरपरिषद

सासवड नगरपरिषद कार्यालय
सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे
Email ID- saswadmc@gmail.com
फोन नं :- ०२११५-२२२३४९,२२२४३७

जावक क्र./बा.वि. /२७७१/२०२६ दिनांक : १२/०८/२०२५

जाहिर दरपत्रक/कोटेशन सुचना

सासवड नगरपरिषद हद्दीतील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अंतर्गत असलेल्या कामासाठी सदर प्रस्तावातील जिल्हा दर सुचीमध्ये नसलेल्या बाबींसाठी बाजारभाव दर जी.एस.टी रक्कम सहीत मागविणेत येत आहेत. तरी इच्छुक पात्रता धारकांनी खालील तक्त्यामध्ये सदर कामांचा तपशील घेऊन आपले दरपत्रक / कोटेशन स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात नगरपरिषदेमध्ये दि.१३/८/२०२६ पासून दि. १९/८/२०२६ रोजी सांयकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करावे. जाहिर दरपत्रक/कोटेशन स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे. याबाबत कोणतेही कारण दिले जाणार नाही.

| अ. क्र. | वस्तुचे वर्णन | नग | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | TL-75SKM1E OEM 4K UHD (3840 x 2160), Android 14, 8GB Ram 128 GB Memory,20 touch,400 Brightness (Nits),1 Years Carry in Warranty With Wall Mount Software for Android, Zero Bonding | १ | |
| २ | Overall Size: 36" (W) x 30" (D) x 26" (H). Frame: Fabricated from 1" x 1" x 2" x 18 Gauge MS square/rectangular pipe structure. Bench Top & Seat: 18 Gauge CRCA sheet. Storage Shelf: One bag/storage shelf fabricated from 0.8 mm thick CRCA sheet. Finish: Powder coated after suitable surface preparation. Construction: Rigid, stable and suitable for regular use by school students. | १ | |

शिक्का

सही/-
(डॉ. कैलास चव्हाण)
मुख्याधिकारी,
सासवड नगरपरिषद, सासवड

जेजुरी नगरपरिषद, जेजुरी
ता. पुरंदर जि. पुणे
संपर्क: ०२११५-२५३१२३ ई-मेल- jn6396@gmail.com

जे.न.पा./जा.क्र./सा.प्र./१८५७/२०२६ दिनांक :- ११/०८/२०२६

प्रेस नोट

जेजुरी नगरपरीषदेकडे १) मोहन माधव खळदकर यांचाकडील दि. ०५/०८/२०२६ रोजी प्राप्त झालेला. अर्जानुसार लवथळेश्वर येथील अशोकाचे धोकादायक झाड काढून टाकण्याची गरज असल्याचे नमूद असून सदर झाड काढून टाकण्याची परवानगी मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी याद्वारे सदर अर्ज नागरिकांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

शिक्का

सही/-
(श्री. चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद

# घाटकोपरमध्ये घरांवर दरड कोसळली, ६ ठार



■ **मुंबई (दै. संध्या)**

मुसळधार पावसामुळे मुंबईतील घाटकोपर पूर्व येथील अशोक नगर, चिराग नगर भागातील गौसिया चाळीवर मध्यरात्री ३ ते ४ घरांवर अचानक दरड कोसळल्याची भीषण दुर्घटना घडली. आज (दि. १२) पहाटे घडलेल्या दुर्घटनेत आतापर्यत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. आणखी दोन जण ढिगा-याखाली अडकलेले आहेत.

अशोक नगर हा डोंगराळ झोपडपट्टीचा भाग आहे. आज पहाटे या ठिकाणी असलेल्या गौसिया चाळीवर एक मोठे पिंपळाचे झाड आणि मोठी दरड खाली चाळीवर कोसळली. पहाटे साडेतीन वाजताच्या दरम्यान गाढ झोपेत ही कुटुंबे असताना त्यांच्यावर हा प्रसंग ओढवला. एकीकडे प्रचंड पाऊस, काळोख आणि अरुंद गल्लीबोळांचा रस्ता यांमुळे अग्निशमन दल आणि एनडीआरएफ यांना बचावकार्य कठीण झाले होते. मात्र पहाट होताना पावसाने उसंत घेतली. यानंतर बचावकार्य जोमाने सुरू झाले. सुरुवातीला दोन मृतदेह बाहेर काढण्यात आले. आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दोन तरुण अजूनही ढिगाऱ्याखाली अडकले असल्याने बचावकार्य सुरूच आहे.

या बचावकार्यादरम्यान दुर्घटनाग्रस्त भागात काम करताना अग्निशमन दलाचे जवान मनोज सोनवणे (वय ३०) आणि शिवम द्विवेदी (वय २९) हे जखमी झाले. त्यांना तातडीने कूपर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर दोघांनाही रुग्णालयातून सुखरूप घरी सोडले आहे.सध्या परिसरात सुरक्षेचा उपाय म्हणून पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, बचावकार्य सुरु आहे.

महापालिका अधिकारी गजानन जैतापकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, रहिवाशांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. यापूर्वीही, पावसाळ्याआधी अनेक घरांना नोटिसा देण्यात आल्या होत्या. बचावकार्य सुरू आहे. आम्ही पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेत आहोत. बाधित भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवले जाण्याची शक्यता आहे.

या नैसर्गिक आपत्तीबाबत माहिती देताना पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांनी सांगितले की, "पावसामुळे घाटकोपर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अशोकनगर भागात दरड कोसळण्याची घटना घडली आहे. बचावकार्य सुरू आहे. येथे पोलिस कर्मचारी तसेच बचावकार्यासाठी आवश्यक असलेली सर्व पथके तैनात करण्यात आली आहेत.

## १४७ इमारतींचा कायापालट; एकनाथ शिंदेंनी दिले महत्त्वाचे निर्देश

■ **मुंबई (दै. संध्या)**

आज सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे साहेबांच्या उपस्थितीत एसटीच्या जागा पीपीपी तत्त्वावर विकसित करण्यासंदर्भात विशेष आढावा बैठक संपन्न झाली. याप्रसंगी परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना व इतर वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित होते.

महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाच्या जागांचा सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून विकास करताना त्या ठिकाणी उभारण्यात येणारी नवीन बसस्थानके आणि इतर वास्तू केवळ आधुनिक सुविधांनी युक्त न राहता 'आयकॉनिक' आणि शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या असाव्यात तसेच नागरिकांना सुविधा देखील मिळाव्यात हे पाहण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

प्रवाशांना अत्याधुनिक, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा देतानाच एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या मालमत्तांचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करावा, असे देखील उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.



### प्रवाशांना आधुनिक सुविधा

राज्यातील अनेक एसटी बसस्थानकांच्या इमारती ४० वर्षांहून अधिक जुन्या असून कालबाह्य पायाभूत सुविधांमुळे प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे 'महाराष्ट्र एसटी महामंडळ २.०' अंतर्गत आधुनिक, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित बसस्थानकांच्या विकासावर भर देण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात १४७ बसस्थानके व एसटीच्या जागांचा पीपीपी तत्त्वावर विकास करण्यात येईल. या माध्यमातून आधुनिक बस पोर्ट, प्रवासी सुविधा, कार्यालये, हॉस्पिटल, चित्रपटगृहे, नागरिक सेवा केंद्रे आदी सुविधा विकसित करण्याचे नियोजन आहे. तसेच सौर ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा आणि एसटीच्या इलेक्ट्रिक बसेससाठी स्वतंत्र चार्जिंग व्यवस्था उभारण्यात येणार आहे. यामुळे प्रवाशांना सुविधा मिळण्याबरोबरच ऊर्जा खर्च आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होणार आहे.

## सिब्बल ठरतायेत आयोगावर वरचढ

■ **नवी दिल्ली (दै. संध्या)**

शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्ह कोणाचं? यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु झालेली आहे. उद्धव ठाकरे गटाच्यावतीने ज्येष्ठ वकिल कपिल सिब्बल सर्वोच्च न्यायालयात युक्तीवाद करत आहेत. ज्या पद्धतीने निवडणूक आयोगाकडून एकनाथ शिंदे यांना पक्ष आणि चिन्ह देण्यात आले, त्यावर कपिल सिब्बल यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कपिल सिब्बल यांनी युक्तीवाद करताना निवडणूक आयोगाचे मुद्दे हाणून पाडत आहेत. यावरून सिब्बल निवडणूक आयोगावर कायम वरचढ ठरत असल्याचे दिसून येत आहे.

२०१८ च्या घटनेनुसार एकनाथ शिंदे यांना मुख्य नेता सांगितले जातय. २०१८ च्या घटनेतील बदल असंवैधानिक तर एकनाथ शिंदे यांची निवड संवैधानिक कशी? कारण २०१८ च्या घटनेतील बदलांना शिंदे गटाने असंवैधानिक ठरवले असा युक्तीवाद कपिल सिब्बल यांनी केला. कपिल सिब्बल यांनी समाजवादी पार्टीतील फुटीचा दाखला दिला. कार्यक्षेत्रात नसलेले निर्णय निवडणूक आयोगाने घेतले. विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष वेगळा असा मुद्दा कपिल सिब्बल यांनी मांडला. पक्ष लोकशाही किंवा अलोकशाही मार्गाने हे ठरवणारा आयोग कोण? असा सवाल सिब्बल यांनी विचारला. पक्षाचा लाभ घेता मग बोलता पक्ष लोकशाही विरोधी असे कपिल सिब्बल म्हणाले.

१० व्या परिशिष्टाचा उल्लेख कपिल सिब्बल यांनी केला. दुसरा गट तयार होणे याचा अर्थ पक्षात फूट पडली असा होत नाही असा युक्तीवाद कपिल सिब्बल यांनी केला. सध्या सर्वोच्च न्यायालयात शिवेसना पक्ष आणि निवडणूक चिन्हासंदर्भात नियमित सुनावणी सुरु आहे. यामध्ये सध्या ठाकरे गटाच्या वकिलांचा युक्तीवाद सुरु आहे. त्यानंतर एकनाथ शिंदे शिवसेनेचे वकिल आपली बाजू मांडतील. २०२३ साली निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला अधिकृत शिवेसना ठरवले. त्यामुळे पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मिळाले.


- कपिल सिब्बल यांच्या मते या निर्णयाची चार भागात विभागणी करता आली असती.
- पहिल्या भागात शिवसेना पक्षात फूट पडली असा निष्कर्ष निवडणूक आयोगाने काढला.
- पक्षाच्या घटनेच्या आधारे हा वाद सोडवता येणार नाही असा निष्कर्ष निवडणूक आयोगाने काढला.
- विधिमंडळातील संख्येच्या आधारावर पक्ष आणि निवडणूक चिन्ह दिले गेले. विधिमंडळातील बहुमतावर पक्ष आणि निवडणूक चिन्ह दिले गेले हे मुद्दे कपिल सिब्बल यांनी मांडले.

## २७ ठिकाणे आणि त्यांची भौगोलिक वैशिष्टये अधिकृत नकाशात नोंदवली

■ **बीजिंग (दै. संध्या)**

चीनने सोमवारी सांगितले होते की, भारताने अरुणाचल प्रदेशातील २७ ठिकाणे आपल्या नकाशात दाखवणे चुकीचे आहे. चीनने याला अमान्य घोषित केले आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, चीन भारताने तयार केलेल्या अरुणाचल प्रदेशच्या नकाशाला मान्यता देत नाही. केंद्र सरकारने शुक्रवारी अरुणाचल प्रदेशातील २७ ठिकाणे आणि त्यांची भौगोलिक वैशिष्टये अधिकृत नकाशात नोंदवली होती.

चीनकडून राज्यातील ठिकाणांची नावे बदलण्याचा प्रयत्न सुरू असताना हे पाऊल उचलण्यात आले आहे. गृह मंत्रालयाच्या मते, हे काम अरुणाचल प्रदेश सरकारशी सल्लामसलत करून करण्यात आले आहे. यामागे या ठिकाणांची योग्य ओळख पटवणे आणि सामान्य लोकांमध्ये जागरूकता वाढवणे हा उद्देश आहे. या नावांना अधिकृत नकाशांमध्ये समाविष्ट करण्याचा उद्देश प्रशासन सुधारणे हा आहे. यामुळे सरकारी नोंदींमध्ये एकरूपता येईल, विविध विभागांमध्ये चांगला समन्वय साधला जाईल आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत पोहोचवणे सोपे होईल. तथापि, या नावांच्या आधारे लोकांच्या पासपोर्ट किंवा इतर वैयक्तिक कागदपत्रांमध्ये काही बदल केले जातील का, हे अद्याप स्पष्ट नाही. सरकारचा मुख्य उद्देश या क्षेत्रांची अधिकृत ओळख निश्चित करणे आणि त्यांना भारताच्या प्रशासकीय नोंदींमध्ये समाविष्ट करणे हा आहे. चीनने अनेकदा अरुणाचल प्रदेशातील ठिकाणांच्या चिनी नावांची यादी जारी केली आहे. तो अरुणाचल प्रदेशला जांगनान म्हणतो.



## थोडक्यात पण महत्वाचे




### म्हाडा टॉवर्समधील ४,६७५ नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-वाघेरे येथील म्हाडा टॉवर्समधील ११ टॉवर्समधील सुमारे ९३५ फ्लॅट आणि ४,६७५ नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून अत्यंत अपुऱ्या पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत आहे. नागरिकांना आवश्यक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित प्रशासनाची असताना, वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रश्नावर ठोस कारवाई होत नसल्याने रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे. नियमानुसार प्रत्येक व्यक्तीला दररोज सुमारे ९० लिटर पाणी उपलब्ध होणे अपेक्षित आहे. मात्र म्हाडा टॉवर्समध्ये नागरिकांना प्रत्यक्षात सरासरी केवळ ३५ लिटर पाणी प्रति व्यक्ती मिळत आहे. म्हणजे प्रत्येक नागरिकाला दररोज तब्बल ५५ लिटर पाण्याची कमतरता भासत आहे. म्हाडा टॉवर्समधील एका टॉवरमध्ये ८५ फ्लॅट असून, सरासरी ५ सदस्य गृहीत धरल्यास एका टॉवरमध्ये सुमारे ४२५ नागरिक आहेत. त्यानुसार एका टॉवरला दररोज सुमारे ३८,५०० लिटर पाण्याची आवश्यकता आहे. दोन दिवसांसाठी ही गरज ७७,००० लिटर होते. ११ टॉवर्ससाठी दोन दिवसांची एकूण गरज तब्बल ८,४१,५०० लिटर इतकी आहे. मात्र उपलब्ध पाण्याच्या आकडेवारीचा विचार करता, प्रत्यक्ष पुरवठा आवश्यकतेपेक्षा मोठ्या प्रमाणात कमी आहे. परिणामी हजारो नागरिकांना पिण्याचे पाणी, स्वयंपाक, स्वच्छता आणि दैनंदिन वापरासाठी पाण्याचे नियोजन करावे लागत आहे. पाणीपुरवठ्याबाबत वेगवेगळी टक्केवारी व आकडेवारी सांगून नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची भावना रहिवाशांमध्ये आहे. “टक्केवारी कोणत्या आधारावर काढली जाते, हे आम्हाला समजत नाही; आम्हाला कोणतीही टक्केवारी नको, आम्हाला फक्त दररोज प्रति व्यक्ती ९० लिटर पाणी हवे,” अशी संतप्त प्रतिक्रिया रहिवाशांनी व्यक्त केली. गेल्या एक महिन्यापूर्वी संबंधित प्रशासनाकडे लेखी निवेदन देऊनही अद्याप कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. वारंवार पत्रे, निवेदने आणि पाठपुरावा करूनही जर नागरिकांच्या मूलभूत पाणी प्रश्नावर प्रशासन कारवाई करत नसेल, तर हा प्रश्न आता अधिक तीव्र स्वरूपात उपस्थित करावा लागणार आहे. महापालिका प्रशासन आणि म्हाडाकडून तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात न आल्यास, पुढील निवेदन महापालिका आयुक्तांना देण्यात येईल आणि त्याची प्रत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात येईल, असा इशारा म्हाडा टॉवर्स फेडरेशनने दिला आहे.

### मोशी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर महापौर रवि लांडगे यांचा वाढदिवस साधेपणाने

**पिंपरी : दैनिक संध्या**

मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पात काही दिवसांपूर्वी घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेत नऊ सहकाऱ्यांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांनी येत्या १५ ऑगस्ट रोजी आपला वाढदिवस कोणत्याही प्रकारच्या जल्लोषात किंवा उत्सवी वातावरणात साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी वाढदिवसानिमित्त नागरिक, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून मिळणारे प्रेम, शुभेच्छा आणि आशीर्वाद हे सार्वजनिक जीवनातील मोठे बळ असल्याचे सांगत, यंदा मात्र मोशी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. याबाबत आवाहन करताना महापौर रवि लांडगे म्हणाले, “मोशी दुर्घटनेत आपल्या नऊ सहकाऱ्यांचे दुःखद निधन झाले. या कुटुंबांवर कोसळलेले दुःख शब्दांत व्यक्त करता येणार नाही. या पार्श्वभूमीवर माझ्या वाढदिवसानिमित्त कोणत्याही प्रकारचा जल्लोष, स्वागत समारंभ किंवा उत्सवी आयोजन करू नये, ही माझी सर्व कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि हितचिंतकांना नम्र विनंती आहे.” वाढदिवसानिमित्त हार, पुष्पगुच्छ, बॅनर, होर्डिंग, फटाके किंवा स्वागत समारंभ आयोजित न करता त्याऐवजी रक्तदान शिबिर, महाआरोग्य शिबिर, दिव्यांग बांधवांना आवश्यक साहित्याचे वाटप तसेच इतर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. “गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्यासाठी केलेले सामाजिक कार्य हीच माझ्यासाठी वाढदिवसाची खरी भेट असेल. दिवंगत सहकाऱ्यांच्या स्मृतींना अभिवादन करत समाजसेवेचा संकल्प अधिक दृढ करूया,” असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले. नागरिक, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी या आवाहनाला प्रतिसाद देत वाढदिवसाच्या शुभेच्छांसाठी होणारा खर्च समाजोपयोगी उपक्रमांसाठी वापरावा आणि या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### राजमाता जिजाऊ उड्डाण पुलाखाली घाणीचे साम्राज्य

**पिंपरी : दैनिक संध्या**

राजमाता जिजाऊ उड्डाण पुलाखाली प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. पुलाच्या पिलरचा (खांबांचा) वापर उघड्यावर दिवसा लघुशंकेसाठी खुलेआम केला जात असल्याने परिसराला शौचालयाचे स्वरूप आले आहे. यामुळे उड्डाण पुलाखाली प्रचंड दुर्गंधी येत आहे. ये-जा करणाऱ्या नागरिकांना आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पुलाखालील कचरा त्वरित साफ करावा. तसेच उघड्यावर लघुशंका करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. सुरक्षेसाठी तसेच पुलाखाली होणारे विद्रुपीकरण रोखण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालक व नागरिकांतून होत आहे. भोसरीतील राजमाता जिजाऊ उड्डाण पुलाची निर्मिती महापालिकेच्या वतीने नागरिकांच्या सोयीसाठी करण्यात आली आहे. नागरिकांचा प्रवास सुखकार होण्यासाठी व दररोजची होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हा पूल महत्त्वाचा ठरत आहे; परंतु या उड्डाण पुलाचा वापर कचरा टाकणे, लघुशंका, दारूचा रिकाम्या बाटल्या आदी गोष्टीसाठी वापर होत आहे. परिणामी वाहनचालक आणि पादचारी हैराण झाले आहेत. उड्डाण पुलाखालून दररोज हजारो नागरिक आणि वाहने ये-जा करतात. मात्र, पुलाखालील कचरा आणि दुर्गंधीमुळे पादचाऱ्यांना नाक दाबून चालावे लागत आहे. अनेक वाहनचालक आपली वाहने पुलाखाली पार्क करतात, त्यांनाही या घाणीचा सामना करावा लागत असल्याचे वाहनचालकांचे म्हणणे आहे. रात्रीच्या वेळी या ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांचे आणि उघड्यावर लघुशंका करणाऱ्यांचे प्रमाण वाढतच आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल नगरिकातून संताप व्यक्त होत आहे. या समस्येबाबत अनेकदा प्रशासनाला कळविण्यात आले आहे; परंतु प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. आरोग्य विभागाचा वतीने परिसराची साफसफाई करण्यात येते. पुलाखालील परिसरात जे बेघर राहतात ते परिसरात अस्वच्छता पसरवित आहेत. उड्डाण पुलाखालील परिसराचा काही भाग प्रभाग क्रमांक 5, 6 आणि 7 मध्ये येतो. तसेच याची देखभाल बीआरटी स्थापत्य विभागाकडे आहे. परंतु, त्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने परिसराच्या सौंदर्याला बाधा येत आहे.

# १,६०९ खड्डे बुजवले असल्याचा महापालिकेचा दावा

## उर्वरित ५५५ खड्ड्यांची दुरुस्ती सुरू : शहरातील प्रत्येक प्रभागात खड्डे बुजविण्यासाठी स्वतंत्र पथके

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची मोहीम महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत वेगाने सुरू आहे. नागरिक, लोकप्रतिनिधी आणि विविध माध्यमांतून येणाऱ्या तक्रारींची तातडीने दखल घेतली जात आहे. संबंधित क्षेत्रीय कार्यालयामार्फत पाहणी करून आवश्यकतेनुसार खड्डे बुजविण्याचे काम केले जात आहे. शहरात रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत आतापर्यंत २,१६४ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी १,६०९ खड्डे बुजविण्यात आले असल्याचा दावा करण्यात आला आहे. उर्वरित ५५५ खड्ड्यांची दुरुस्ती सुरू आहे.

महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत शहरातील विविध रस्त्यांची देखभाल आणि दुरुस्ती केली जाते. खड्ड्यांबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे पथक त्या ठिकाणी जाऊन पाहणी करते. खड्ड्याचा आकार, खोली, रस्त्याची स्थिती, वाहतुकीची वर्दळ आणि पावसाची परिस्थिती याचा विचार करून दुरुस्तीसाठी योग्य साहित्य निवडले जाते. त्यानंतर खड्डा बुजवून कामाची नोंद केली जाते. यामध्ये तक्रार प्राप्त ठिकाणाची पाहणी खड्ड्याची स्थिती तपासणी योग्य साहित्याची निवड खड्डा बुजविणे कामाची पाहणी व नोंद, अशा पद्धतीने ही कार्यवाही केली जात आहे. आतापर्यंत बुजविण्यात आलेल्या १,६०९ खड्ड्यांपैकी ५५६ खड्डे कोल्ड मिक्स, २३ बीबीएम, ७५४ जीएसबी, १२० पेव्हिंग ब्लॉक आणि १५६ खड्डे कॉँक्रिटच्या माध्यमातून बुजविण्यात आले आहेत.



“ रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याबाबत संबंधित यंत्रणांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. प्राप्त तक्रारींचे वेळेत निराकरण करण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंत्यांची आहे. विभागप्रमुखांनी या कामावर नियमित नियंत्रण ठेवण्याबाबत तसेच तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या अभियंत्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई प्रस्तावित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### प्रत्येक प्रभागात स्वतंत्र पथके कार्यरत..

शहरातील प्रत्येक प्रभागात खड्डे बुजविण्यासाठी स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली आहेत. या पथकांना आवश्यक साहित्य, साधनसामग्री, मनुष्यबळ आणि स्वतंत्र वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ही पथके प्रमुख तसेच अंतर्गत रस्त्यांची पाहणी करून आढळणारे खड्डे तातडीने बुजवित आहेत. सध्या पावसाळा सुरू असल्याने डांबर प्लांट बंद आहे. त्यामुळे कोल्ड मिक्स, बीबीएम, जीएसबी, पेव्हिंग ब्लॉक आणि कॉँक्रिट यांचा वापर करून खड्डे बुजविण्यात येत आहेत. मात्र, सततच्या पावसामुळे काही ठिकाणी रस्त्यांवर पुन्हा पाणी साचते. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात बुजविलेले काही खड्डे पुन्हा खराब होण्याची शक्यता असते. अशा ठिकाणी परिस्थितीनुसार पुन्हा दुरुस्ती केली जात आहे.

### पावसाची उघडीप मिळताच कायमस्वरूपी दुरुस्ती..

पावसाची मोठी उघडीप मिळाल्यानंतर रस्त्यांची दुरुस्ती अधिक प्रभावीपणे करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. पावसाळ्यात रस्ते आणि डांबराचे साहित्य ओलसर असल्याने डांबरीकरणासाठी आवश्यक गुणवत्ता मिळत नाही. त्यामुळे सध्या नागरिकांची गैरसोय कमी करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे. पावसाळा संपल्यानंतर डांबर प्लांट सुरू झाल्यावर पावसाळ्यात तात्पुरती दुरुस्ती केलेल्या ठिकाणांची पुन्हा पाहणी केली जाईल. आवश्यकतेनुसार या ठिकाणी कायमस्वरूपी डांबरीकरण करण्यात येणार आहे. तसेच दोषदायित्व कालावधी लागू असलेल्या रस्त्यांवर खड्डे पडल्यास संबंधित ठेकेदारामार्फतच दुरुस्ती करून घेण्यात येणार आहे. दुरुस्ती करण्यास टाळाटाळ करणाऱ्या ठेकेदारांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

“ पावसाची तीव्रता आणि सातत्याने होणाऱ्या पावसामुळे काही ठिकाणी रस्त्यांवर पुन्हा पाणी साचून तात्पुरत्या स्वरूपात बुजविलेले खड्डे खराब होत आहेत. नागरिकांची गैरसोय कमी करण्यासाठी उपलब्ध साहित्याच्या माध्यमातून खड्डे बुजविण्याचे काम वेगाने सुरू आहे. पावसाची मोठी उघडीप मिळाल्यानंतर दुरुस्तीची कामे अधिक प्रभावीपणे केली जातील. तसेच पावसाळ्यानंतर डांबर प्लांट सुरू झाल्यावर आवश्यक त्या ठिकाणी कायमस्वरूपी डांबरीकरण करण्यात येईल.

– प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## विकसित भारतासाठी उच्च कौशल्य प्राप्त मनुष्यबळ आवश्यक : ज्ञानेश्वर लांडगे

**■ पिंपरी (दै. संध्या)**

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी उच्च दर्जाचे तांत्रिक कौशल्य प्राप्त कुशल मनुष्यबळ निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टने आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक विद्यापीठे, आस्थापना यांच्याशी सामंजस्य करार केले आहेत. यामुळे विद्यार्थी व प्राध्यापकांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चा, परिसंवाद, शैक्षणिक दौरे यामध्ये सहभागी होता येते. या करार अंतर्गत क्रोएशिया, इजिप्त, केनिया आणि सोमालिया च्या दूतावास मधील शिष्टमंडळाने पीसीईटी कॅम्पस मध्ये आणि रावेत येथील एसबी पाटील पब्लिक स्कूल मध्ये केलेला शैक्षणिक संवाद दौरा महत्त्वपूर्ण आहे अशी माहिती पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी दिली.



पीसीईटीच्या कॅम्पस मध्ये क्रोएशिया, इजिप्त, केनिया आणि सोमालिया च्या दूतावास मधील शिष्टमंडळाने नुकतीच भेट दिली. या शिष्टमंडळात क्रोएशिया प्रजासत्ताक दूतावासचे उप प्रमुख ब्रानिमीर फरकास, इजिप्त दूतावासचे सांस्कृतिक आणि शैक्षणिक संबंध विभाग प्रमुख डॉ. आयत साद अहमद इस्माईल, केनिया दूतावासचे द्वितीय सचिव ॲन कासिचाना या, सोमालिया दूतावास चे वाणिज्य सहकारी अब्दिरिसाक सेद नूर, इजिप्त दूतावासचे सचिव सेविका लामा यांचा समावेश होता त्यांचे स्वागत पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई केले.

## पिंपरी-चिंचवडमध्ये भटक्या कुत्र्यांचा वाढता धोका

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरात भटक्या कुत्र्यांची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेल्या अवघ्या चार महिन्यांत तब्बल १३ हजार ६१५ नागरिकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेषतः लहान मुलांवरील हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

म्हेत्रेवस्ती येथे नुकत्याच घडलेल्या घटनेत ५ वर्षांच्या चिमुकलीवर ५ ते ७ कुत्र्यांनी जीवघेणा हल्ला केला होता. त्यानंतर आता वाल्हेकरवाडीतील चिंचवडे नगर परिसरात एका लहान मुलावर कुत्र्यांच्या टोळक्याने अचानक हल्ला केल्याचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. सुदैवाने स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेतल्याने मुलाचा जीव वाचला. शहरात सध्या ९० हजारांहून अधिक भटक्या कुत्र्यांचा वावर असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

हॉटेल्स, खाद्यपदार्थ विक्रेते आणि उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या अन्नकचऱ्यामुळे कुत्र्यांची संख्या वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रात्रीच्या वेळी वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या अंगावर कुत्रे धावून जात असल्याने अपघातांच्या घटनाही वाढत आहेत.

## गुरुवर्य अकॅडमी स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ उत्साहात

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पुण्यातील ,चिखली येथील गुरुवर्य अकॅडमी स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ (इन्व्हेस्टिचर सेरेमनी) अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि अभिमानास्पद वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये बालपणापासूनच नेतृत्वगुण विकसित व्हावेत, त्यांच्यात जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी आणि लोकशाही मूल्यांची योग्य रुजवणूक व्हावी, या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यास शाळेच्या व्यवस्थापन समितीचे प्रतिष्ठित सदस्य मोठ्या संख्येने



उपस्थित होते. यात संस्थापक-अध्यक्ष भूषण मावळे, सह-संस्थापक व सचिव अनिल बेलकेरी, सह-संस्थापक व खजिनदार प्रसाद शेट्टी, विश्वस्त कैलास मोरे, संस्थापक-मुख्याध्यापिका ज्योत्स्ना मावळे यांच्यासह विश्वस्त ज्योती बेलकेरी, शुभा शेट्टी आणि रूपाली मोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## चिंचवड आनंदनगर एकच सर्वे क्रमांक दुसरा सर्वे क्रमांक तयार करून एसआरए प्रकल्पास मंजुरी

**■ पिंपरी (दै. संध्या)**

चिंचवड येथील आनंदनगर झोपडपट्टीच्या पुनर्वसनाच्या नावाखाली कोट्यावधींची किंमत असलेली तब्बल 4 एकर 19 गुंठे जमीन बळकवण्याचा प्रयत्न झाला आहे त्यासाठी जागेचा सर्वे क्रमांक सीमारेषेची कागदोपत्री हेराफेरी करण्यात आली आहे नगर भूमापन व भूमी अभिलेख, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, महापालिका आणि महसूल विभागातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून कोट्यावधींची जमीन लाटण्याचा खटाटोप करण्यात आला आहे. या प्रकरणात बिल्डर, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, भूमि अभिलेख विभाग आणि थेट राज्याच्या महसूल मंत्र्यांपर्यंत हितसंबंधाची



साखळी निर्माण झाल्याचा संशय आहे या सर्वांच्या विरोधात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे ईमेलवर तक्रार केल्याचे आम आदमी पार्टी युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांनी सांगितले. आनंदनगर झोपडपट्टी ही मूळतः सर्वे क्रमांक 242 वर वसलेली आहे ही संपूर्ण जागा एकूण 11 एकर आहे या झोपडपट्टीचे पुनर्वसन करण्यासाठी मे रेणुका कन्स्ट्रक्शन यांनी 2022 मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून प्रस्ताव मंजूर करून घेतला. या प्रस्तावात झोपडपट्टी सर्वे क्रमांक 242 वर असल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले होते मात्र स्थानिक झोपडीधारकांचा या पुनर्वसनाला तीव्र विरोध होता त्यांची खोटी संमती पत्रे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला सादर करून रेणुका कन्स्ट्रक्शन यांनी पुनर्वसन प्रस्तावना मंजुरी घेतल्याचा आरोप झोपडीधारकांनी केला झोपडपट्टी धारकांनी या पुनर्वसन प्रकल्पास त्यांचा विरोध असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे खोटी कागदपत्रे सादर करून झोपडीधारकांसह शासनाची फसवणूक केल्याचे उघडकीस आणले.

## शहरातील रस्ते सुशोभिकरण, देखभालीसाठी पीपीपी आणि सीएसआर धोरण

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहरातील वाढते नागरीकरण आणि सौंदर्यीकरण कायम राखण्यासाठी महापालिकेने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शहरातील प्रमुख रस्ते, आयलंड आणि मध्य दुभाजकांच्या सुशोमीकरणाची व नूतनीकरणाची देखभाल आता पीपीपी (PPP), सीएसआर (CSR) किंवा सीएमआर (CMR) तत्त्वावर करण्यात येणार आहे. यासंदर्भातील धोरणात्मक मसुद्याला स्थायी समितीने मंजुरी दिल्याची माहिती सभापती अभिषेक बारणे यांनी दिली आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षसंवर्धन विभागामार्फत शहरातील विविध भागात रस्ते, आयलंड आणि मध्य दुभाजक सुशोभित करण्यात आले आहेत. मात्र, या कामांची दीर्घकालीन आणि योग्य देखभाल करणे प्रशासनासमोर एक मोठे आव्हान होते. हे आव्हान लीलया पेलण्यासाठी आणि महापालिकेवर अतिरिक्त आर्थिक भार न पडता खासगी सहभागातून शहराचे सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी हे नवीन धोरण तयार करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत रस्त्यांच्या सुशोभिकरणाची देखभाल पीपीपी किंवा सीएसआर तत्त्वावर देण्याची पॉलिसी अमलात आणली जाणार आहे.

या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक ठिकाणांच्या देखभालीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार असून, शहराचे सौंदर्य अधिक बहारदार होईल.

स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी घेतलेल्या या दूरदर्शी निर्णयामुळे शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासात आणि सौंदर्यीकरणात भर पडणार आहे.

“पिंपरी-चिंचवड शहर हे एक प्रगतशील आणि सुंदर शहर म्हणून ओळखले जाते. शहरातील रस्ते, आयलंड आणि दुभाजकांच्या सौंदर्यीकरणावर आपण भर दिला आहे, परंतु त्यांची नियमित व उत्तम देखभाल करणेही तितकेच गरजेचे आहे. महापालिकेच्या तिजोरीवर अतिरिक्त आर्थिक भार न पडता, खासगी लोकसहभाग (PPP) आणि सीएसआर (CSR) फंडच्या माध्यमातून ही देखभाल प्रभावीपणे करता येईल. या धोरणामुळे शहराचे सौंदर्य कायम टिकून राहण्यास मदत होईल आणि नागरिकांना अधिक सुंदर व स्वच्छ वातावरण अनुभवायला मिळेल.”

## थोडक्यात पण महत्वाचे




### कांदळी गोळीबारप्रकरणी मुख्य आरोपी जेरबंद

**नारायणगाव : दैनिक संध्या**

कांदळी येथील कला केंद्रात बारी लावण्याच्या वादातून झालेल्या गोळीबार प्रकरणी फरार असलेल्या मुख्य आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.शिवशंकर मारुती हळदेकर वय २८, रा. मेदनकरवाडी असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, जुन्नर न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. कांदळी येथील श्री तुळजाभवानी सांस्कृतिक कला केंद्रात तिसरी बारी लावण्यास नकार दिल्याच्या कारणावरून शिवशंकर हळदेकर व त्याच्या तीन साथीदारांनी केंद्राचे व्यवस्थापक अक्षय धोंगडे तसेच कर्मचाऱ्यांना मारहाण केली होती. यावेळी झालेल्या गोळीबारात फिरोज कादीर शेख हा तरुण जखमी झाला होता. घटनेनंतर आरोपी फरार झाले होते. दरम्यान, स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने खेड परिसरात शोधमोहीम राबवून शिवशंकर हळदेकर याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला पुढील कारवाईसाठी नारायणगाव पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. अटक करण्यात आलेला हळदेकर हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्याच्यावर केबल चोरीचे पाच गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दरम्यान, या प्रकरणातील फरार असलेल्या अन्य तीन आरोपींचा शोध सुरू असून, गोळीबारासाठी वापरण्यात आलेले पिस्तूल जप्त करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नारायणगाव पोलिस करत आहेत.

### श्री स्वामी समर्थ महाविद्यालयाचा उद्योगक्षेत्राशी सामंजस्य करार

**नारायणगाव : दैनिक संध्या**

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना प्रत्यक्ष औद्योगिक क्षेत्राचे प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने श्री स्वामी समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, माळवाडी (बोटा) आणि सिन्नर (जि. नाशिक) येथील नामांकित जेनोम बायोटेक प्रा. लि. कंपनी यांच्यात नुकताच एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे फार्मसी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना औषधनिर्मिती उद्योगातील प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेता येणार असून त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांना मोठी चालना मिळणार आहे.तसेच विद्यार्थ्यांना औषधनिर्मिती क्षेत्रातील गुणवत्ता नियंत्रण, गुणवत्ता हमी, उत्पादन प्रक्रिया आणि संशोधन क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण मिळेल. या अंतर्गत कॉलेजमधील विद्यार्थ्यांना औद्योगिक भेटी , विशेष कार्यशाळा आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांचे थेट मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे.सध्याच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून दिली जाईल, ज्यामुळे त्यांच्या रोजगाराच्या संधी अधिक वाढतील. संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजी पोखरकर यांनी या कराराबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, "आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाच्या गरजेनुसार सक्षम बनवण्यासाठी शिक्षण क्षेत्र आणि उद्योग जगतामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. हा करार विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल."तसेच संस्थेचे सचिव डॉ. अमित पोखरकर यांनी स्पष्ट केले की, या अभ्यासपूर्ण भागीदारीमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शिकता येईल आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळाल्यामुळे त्यांना रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतील.

### चाकणला कर्तुत्ववान महिलांचा गौरव पुरस्काराने सन्मान

**चाकण : दैनिक संध्या**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून चाकण येथे कर्तुत्ववान महिलांचा गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. येथे आयोजित करण्यात आलेल्या एका पुरस्कार वितरण समारंभात खेडचे आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी नगराध्यक्षा मनीषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी व महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे यांना गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच अर्चना संघर्ष वेल्फेअर फाऊंडेशनच्या अध्यक्षा अर्चना गायकवाड, दिशा वेल्फेअर फाऊंडेशनच्या संस्थापक जगदीश पवार व वैशाली पानसरे यांनाही विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी नगरसेविका आरती परदेशी, साधना गोरे, आरपीआय नेते सचिन वाघमारे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व गटनेते नितीन गोरे, उद्योजक राहुल कांडगे, प्रेम जगताप, संदिपान झोंबाडे, भाऊसाहेब आढागळे, अशोक कांबळे, भाऊसाहेब वायदंडे, बापूसाहेब वाघमारे, तानाजी लोखंडे, विठ्ठल चांदणे, संदेश झाडे, मिलिंद आजादे, दत्ता कांबळे, बापू घोलप आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### जिल्हा गुणवत्ता यादीत सविंदणे शाळेची दमदार कामगिरी

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता चौथी) मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सविंदणेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत साईराज सुभाष पडवळ, सुयश बाळासाहेब इचके आणि कृष्णा राहुल मिंडे यांनी प्रत्येकी २६२ गुण, तर शिवन्या राहुल नरवडे हिने २५२ गुण मिळवत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यांचा मोलाचा वाटा आहे. मुख्याध्यापक लहू मनाजी शितोळे, वर्गशिक्षक अशोक गोरख फसले आणि सहशिक्षक गणेश बाळू पवार यांच्या मार्गदर्शनाचे विशेष कौतुक होत आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी डॉ. प्रितम कोकणे, शिक्षण विस्तार अधिकारी मुकुंद देंडगे, केंद्रप्रमुख बाळासाहेब आसवले तसेच शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आळेफाटा येथे जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

**■ नारायणगाव : (दै. संध्या)**

आदिवासी समाजाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान आणि निसर्गाशी असलेले अतूट नाते यांची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यासाठी, श्री जे. आर. गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, आळेफाटा येथे जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला महान आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा आणि स्वातंत्र्यवीर राघोजी भांगरे यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी वक्त्यांनी त्यांच्या शौर्य, देशभक्ती, त्याग आणि अन्यायाविरुद्धच्या संघर्षावर प्रकाश टाकला.

शालेय विद्यार्थ्यांनी आदिवासी संस्कृती, परंपरा, लोकजीवन आणि पर्यावरण संवर्धनातील त्यांच्या भूमिकेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच पारंपारिक आदिवासी वेशभूषा परिधान करून विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमासाठी डॉ. संजय देवकर प्राचार्य, विलास तांबे महिला शिक्षण महाविद्यालय, डुंबरवाडी हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना आदिवासी समाजाचा इतिहास, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक विकासातील त्यांच्या योगदान यावर मोलाचे मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रदीप गुंजाळ होते.

याप्रसंगी डॉ. अनुजा गुंजाळ, प्राचार्या सोनल कानडे, जयहिंद कॉलेज ऑफ नर्सिंगचे कार्यकारी अधिकारी हृषिकेश खर्डे ,शरद दरेकर, प्रशासक विठ्ठल म्हस्के आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीतील विविधतेचा आदर करत सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय एकात्मतेची भावना जोपासावी, असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आदिवासी समाजाच्या समृद्ध परंपरा, संस्कृती, शौर्य आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानाची ओळख करून देणारा तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात देणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व ज्ञानवर्धक ठरला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जुन्नर उपविभागीय बाजार समिती सेवक पतसंस्थेची ४१ वी वार्षिक सभा संपन्न


**■ शिरूर (दै. संध्या)**

मंचर येथे झालेल्या पतसंस्थेच्या वार्षिक सभेत जाहीर करण्यात आले की, जुन्नर, खेड, आंबेगाव, शिरूर आणि मावळ या पाच तालुक्यांमध्ये कार्यक्षेत्र असलेल्या जुन्नर उपविभागीय बाजार समिती सेवक सहकारी पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ३५ लाख २ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. या नफ्यातून सभासदांना १२ टक्के लाभांश वाटप करण्यात येणार आहे. जुन्नर बाजार समिती सेवक पतसंस्थेची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सभेची सुरुवात झाली.सभेमध्ये संस्थेच्या अधिकृत आर्थिक आकडेवारीची माहिती देण्यात आली.त्यामध्ये एकूण वसूल भागभांडवल २ कोटी ५४ लाख रुपये,सभासदांच्या ठेवी २१ लाख रुपये असून,संस्थेचे एकूण उत्पन्न ४२ लाख ३५ हजार रुपये आहे.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष निलेश अत्रे यांनी सांगितले की, आगामी काळात संस्थेचे भागभांडवल वाढवणे आणि नव्या मुदत ठेवी आकर्षित करणे यावर विशेष भर दिला जाईल. तसेच या कार्यक्रमादरम्यान सेवानिवृत्त सभासद प्रभू नर्के यांचा सन्मान करण्यात आला, तसेच गुणवंत सभासदांच्या मुला-मुलींचा गौरव देखील करण्यात आला.

या सभेला संस्थेचे संचालक बंडूशेठ जाधव, शिरूर बाजार समितीचे प्रशासक हरिश्चंद्र कांबळे, पी. एस. राऊतमारे, पतसंस्थेचे संस्थापक व शिरूर बाजार समितीचे माजी सचिव पी. एन. ढोकले, दिलीप मैड, व्ही. एम. पवार व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नैसर्गिक ओढा बुजवून भूमी अभिलेख कार्यालयाची नवी इमारत?

**■ शिरूर (दै. संध्या)**

नागरिकांच्या जागा तसेच शेतजमिनींची शासकीय अधिकृत मोजणी करून हद्द कायम करणे आणि संबंधित जागेची मोजणी क प्रत उपलब्ध करून देणाऱ्या शिरूर भूमी अभिलेख कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी नैसर्गिक ओढा बुजविण्यात आल्याचा धक्कादायक आरोप नागरिकांनी केला आहे. तहसील कार्यालयालगत सुरू असलेल्या या बांधकामाची महसूल प्रशासनाने तातडीने स्थळ पाहणी करून प्रत्यक्ष पंचनामा करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

शिरूर तहसील कार्यालयाजवळ भूमी अभिलेख कार्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम सध्या जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सुरू आहे. मात्र, या ठिकाणाहून पूर्वीपासून वाहत असलेला नैसर्गिक ओढा बुजवून त्याच ठिकाणी बांधकाम सुरू असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. याबाबत नागरिकांनी भूमी अभिलेख कार्यालयाचे उपअधीक्षक अमोल भोसले यांच्या निदर्शनासही ही बाब आणून दिल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, त्यानंतरही बांधकाम सुरू असल्याने नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नैसर्गिक जलप्रवाह असलेल्या जागेवर बांधकामाला परवानगी कशी मिळाली? तसेच या ठिकाणी ओढा अस्तित्वात असताना बांधकामासाठी निधी मंजूर करताना संबंधित यंत्रणांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली होती का? बांधकामासाठी जागा निश्चित करताना नैसर्गिक जलप्रवाहाची नोंद घेण्यात आली होती का? असे अनेक प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. विशेष म्हणजे, अनेक वर्षांपासून अस्तित्वात असल्याचे नागरिकांचे म्हणणे असलेला हा नैसर्गिक ओढा भूमी अभिलेख विभागाच्या तसेच संबंधित शासकीय यंत्रणांच्या निदर्शनास कसा आला नाही, असा सवालही उपस्थित होत आहे. ओढा बुजविण्यापूर्वी अथवा बांधकाम सुरू करण्यापूर्वी महसूल विभागाकडून जागेची स्थळ पाहणी व पंचनामा करण्यात आला होता का? याबाबतही स्पष्टता देण्याची मागणी होत आहे. नैसर्गिक ओढे, नाले आणि जलप्रवाह बुजविल्यामुळे भविष्यात पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊन परिसरात पाणी साचण्याची अथवा इतर समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. भूमी अभिलेख कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी जागेची निवड, मंजुरी, निधी आणि प्रत्यक्ष बांधकामापूर्वी करण्यात आलेली पाहणी या सर्व बाबींची चौकशी होणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नैसर्गिक ओढा बुजविण्यात आल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास त्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्ती अथवा संबंधित यंत्रणांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत श्री ज्ञानेश्वर विद्यालयाचे घवघवीत यश

**■ आळंदी देवाची : (दै. संध्या)**

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व श्री ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यामंदिराने शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी केली. इयत्ता चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत दोन्ही प्रशालेतील सात विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविले.

श्री ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यामंदिराच्या इयत्ता चौथीच्या परीक्षेस ४२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रशालेचा निकाल ७३.१७ टक्के लागला. प्रणव अंगद तांदळे (२४६ गुण), शौर्य नागो पाटील (२४२), श्रेया राजाभाऊ वरवटे (२३६) आणि आकांक्षा सतीश घाडगे (२२०) यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविले.श्री ज्ञानेश्वर विद्यालयाच्या इयत्ता सातवीच्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस २७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी दोन विद्यार्थी गैरहजर, तर नऊ विद्यार्थी पात्र ठरले. प्रशालेचा निकाल ३६ टक्के लागला. राम काशिनाथ पोमनार (२६६ गुण), सार्थक गणेश शेलार (२५०) आणि ज्ञानदा संजय कंठाळे (२३२) यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. चौथीच्या विद्यार्थ्यांना प्रतिभा रवींद्र भालेराव व राहुल दत्तात्रय चव्हाण, तर सातवीच्या विद्यार्थ्यांना समन्वयक छाया कुऱ्हाडे, श्रीकांत घुंडरे, संदीप वालकोळी व अतुल भांडवलकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव अजित वडगावकर, संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, पर्यवेक्षिका अनिता पडळकर, अनुजायिनी राजहंस, हेमांगी उपरे, मुख्याध्यापक प्रदीप काळे, गुणवत्ता समिती प्रमुख नारायण पिंगळे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## खळदच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गुणवंतांचा गौरव!

### पर्सिस्टंट फाउंडेशन व स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

**■ जेजुरी (दै. संध्या)**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देत त्यांच्या गुणवत्तेला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने खळद येथील श्री. शिवशंभो माध्यमिक विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना पर्सिस्टंट फाउंडेशनच्या वतीने आणि स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या सहकार्याने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी रीट संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या "लॅब ऑन व्हील्स " या विज्ञानविषयक अभिनव उपक्रमांतर्गत आयोजित विज्ञान व्हिडिओ सादरीकरण स्पर्धेतील विद्यार्थ्यांना रीट संस्थेचे विश्वस्त श्रीधर नाळे आणि स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी, प्रयोगशीलता वाढावी आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांना शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने "लॅब ऑन व्हिल्स"च्या माध्यमातून विविध विज्ञानविषयक उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग, वैज्ञानिक विचार आणि सर्जनशील मांडणी यांचा अनुभव मिळत आहे.असे मत श्रीधर नाळे यांनी व्यक्त केले. स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असून, गरजू विद्यार्थ्यांना स्कूल किट, दप्तर, वह्या व अन्य शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याबरोबरच विविध शाळांना आवश्यक ते सहकार्य केले जात आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत, यासाठी प्रतिष्ठान सातत्याने कार्यरत आहे.

# कानगाव विद्यालयातील विद्यार्थिनींना गणवेश वाटप

**■ पुणे(दै. संध्या)**

दौंड तालुक्यातील कानगाव येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील होतकरू व गरजू विद्यार्थिनींना सामाजिक कार्यकर्ते नवनाथ चौंडकर व परिवाराच्या वतीने नुकतेच गणवेशाचे वाटप करण्यात आले. गेल्या चौदा वर्षांपासून नवनाथ चौंडकर यांच्या माध्यमातून विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे.

विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य व आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच आर्थिक अडचणींमुळे त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये, या उद्देशाने चौंडकर परिवाराकडून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

यावेळी अक्षरसृष्टी संस्थेचे अध्यक्ष सिद्धनाथ पवार, नायगावचे माजी उपसरपंच व नायगाव विविध कार्यकारी विकास सोसायटीचे विद्यमान चेअरमन चंद्रकांत चौंडकर, बबन चौंडकर, काळुराम चौंडकर, अलका चौंडकर, नानासाहेब गवळी, विठ्ठल कोऱ्हाळे, मारुती कोऱ्हाळे, संदीप जाधव, भाऊसाहेब कोऱ्हाळे, राजेंद्र भदरगे, चंद्रकांत चाबुकस्वार, विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.







दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक




# महाराष्ट्राला सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनविण्याचा निर्धार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : राज्यात ४०० नवीन जागतिक क्षमता केंद्रे, ४ लाख उच्च कौशल्याधारित रोजगार आणि ५० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे उद्दिष्ट




■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांसाठी (जिसीसी) भारतातील आघाडीचे आणि सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनविण्याचा राज्य शासनाचा निर्धार असून, राज्यात ४०० नवीन जागतिक क्षमता केंद्रे, ४ लाख उच्च कौशल्याधारित रोजगाराच्या संधी आणि ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हॉटेल कॉनराड येथे आयोजित जीसीसीप्रोज नेतृत्व शिखर परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक व धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे, जीसीसीप्रोजचे मुख्य सल्लागार निलेश देशमुख, शम्मी प्रभाकर, वरिष्ठ अधिकारी तसेच विविध जागतिक क्षमता केंद्रांचे प्रमुख, उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, भारतातील जागतिक क्षमता केंद्रांच्या वाटचालीची सुरुवात कुशल मनुष्यबळ, कौशल्य आणि खर्चाच्यादृष्टीने कार्यक्षमतेच्या आधारे झाली. मात्र, आता या क्षेत्राचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलत आहे. सन २०३० मधील जागतिक क्षमता केंद्रे केवळ कार्यालयीन सहाय्यक कामकाजापुरती मर्यादित राहणार नाहीत. ती अभियांत्रिकी, कृत्रिम बुद्धिमत्ता, उत्पादन विकास, सायबर सुरक्षा, वित्तीय सेवा, माहिती विश्लेषण तसेच संशोधन व विकासाची केंद्रे बनतील. या केंद्रांमधून जागतिक व्यवसायांचे महत्त्वपूर्ण निर्णयही घेतले जातील.

महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रात मोठी आघाडी मिळवून देणारे वैशिष्ट्य म्हणजे या केंद्रांसाठी आवश्यक असलेली सर्वसमावेशक परिसंस्था राज्यात आधीपासूनच उपलब्ध आहे. मुंबईकडे देशातील सखोल वित्तीय व व्यावसायिक परिसंस्था आहे. पुण्याकडे अभियांत्रिकी, वाहन उद्योग, उत्पादन क्षेत्र, तंत्रज्ञान आणि गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाचा मजबूत आधार आहे.

नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या शहरांमध्येही जागतिक क्षमतेची विशेषीकृत केंद्रे विकसित करण्याची क्षमता आहे. त्यामुळे महाराष्ट्रात केवळ एका शहरात गुंतवणूक करण्याची संधी नसून, विविध शहरांमध्ये उपलब्ध असलेल्या प्रतिभा, कौशल्य आणि औद्योगिक क्षमतांचा एकत्रित लाभ घेण्याची संधी आहे. महाराष्ट्रात केवळ एक चांगले शहर नाही, तर शहरांचे, प्रतिभेचे आणि क्षमतांचे संपूर्ण जाळे उपलब्ध आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

पुण्याने सन २०२५ मध्ये जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रातील आपली योग्यता सिद्ध केली आहे. सन २०२५ मध्ये पुणे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे जागतिक क्षमता केंद्राची कार्यालयीन बाजारपेठ बनले असून, मागील वर्षाच्या तुलनेत या केंद्रांच्या संख्येत दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. सन २०२६ च्या अखेरीस जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रात पुणे देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. केवळ अधिक चांगली आर्थिक सवलत देऊन महाराष्ट्राने जागतिक क्षमता केंद्रे आकर्षित करावीत, अशी शासनाची भूमिका नाही. अनुदानामुळे गुंतवणूक आकर्षित होऊ शकते; मात्र दीर्घकाळ टिकणारी परिसंस्था प्रतिभावान मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, व्यवसाय सुलभता, जीवनमान, संशोधन, विद्यापीठे, दळणवळण सुविधा आणि शासन व उद्योग यांच्यातील विश्वासावर उभी राहते, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

राज्याच्या जागतिक क्षमता केंद्र धोरणामध्ये वेतनावरील अनुदान, भांडवली खर्च किंवा भाड्यासाठी सहाय्य, व्याज अनुदान, संशोधन व विकासासाठी सहाय्य तसेच अन्य आर्थिक प्रोत्साहनांचा समावेश आहे. यासोबतच उद्योगाचा दर्जा, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (FSI), क्षेत्रवापरातील लवचिकता, जमिनीची प्राधान्याने उपलब्धता, डिजिटल माहिती संग्रह, विश्वासार्ह पायाभूत सुविधा आणि चोवीस तास, सातही दिवस कार्यपद्धतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. मात्र, ही सर्व साधने असून खरे उद्दिष्ट क्षमता निर्माण करणे हे आहे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

उद्योगांसमोर आज केवळ कर्मचारी उपलब्ध होण्याचा प्रश्न नाही. योग्य कौशल्य असलेले कर्मचारी उपलब्ध होतील का, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन कुशल मनुष्यबळाची उपलब्धता साखळी निर्माण करणे आवश्यक आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे रोजगाराचे स्वरूप वेगाने बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता अभियंते, माहिती-विश्लेषण तज्ज्ञ, सायबर सुरक्षा तज्ज्ञ, अर्धवाहक तंत्रज्ञान अभियंते, उत्पादन व्यवस्थापक, प्रगत उत्पादन तंत्रज्ञान अभियंते, परिमाणात्मक वित्तीय क्षेत्रातील तज्ज्ञ आणि जीवविज्ञानविषयक तज्ज्ञ अशा विविध कौशल्यांची मागणी वाढत आहे. सरकार, उद्योग आणि शिक्षण क्षेत्राने एकत्रितपणे भविष्यातील कौशल्यांची निर्मिती करणे आवश्यक आहे. उद्योगांनी विद्यापीठांमध्ये भविष्यात कोणती कौशल्ये शिकवली जावीत, याबाबत मार्गदर्शन करावे. पाच वर्षांपूर्वी कोणती कौशल्ये आवश्यक होती, यापेक्षा पुढील पाच वर्षांत कोणती कौशल्ये आवश्यक असतील, हे उद्योगांनी सांगावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात महाराष्ट्राला आघाडीवर राहायचे आहे. यावर्षी दावोस येथे बीकेसी मध्ये "कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या वापर, संशोधन आणि नवोन्मेषावर केंद्रित केंद्र" स्थापन करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. भविष्यातील तंत्रज्ञानाच्या निर्मितीत महाराष्ट्राने महत्त्वाची भूमिका बजावावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. अर्धवाहक तंत्रज्ञान, वित्तीय तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, प्रगत अभियांत्रिकी, औषधनिर्माण संशोधन व विकास, विद्युत वाहन तंत्रज्ञान आणि औद्योगिक तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राकडे आधीपासूनच भक्कम औद्योगिक क्षमता आहे. जागतिक क्षमता केंद्रांची पुढील पिढी या क्षमतांच्या संगमावर विकसित झाली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

### शासनाच्या कार्यपद्धतीतही परिवर्तन करू

जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रात परिवर्तन अपेक्षित असेल, तर शासनानेही आपल्या कार्यपद्धतीत परिवर्तन घडवून आणले पाहिजे. आजच्या वेगवान आणि सतत बदलणाऱ्या जगात शासनानेही संस्थेसारखे आणि व्यासपीठासारखे कार्य करणे आवश्यक आहे. उद्योगांना नियमित मंजुरीसाठी आठवडे किंवा महिने प्रतीक्षा करावी लागू नये. त्यांना निश्चितता, एक स्पष्ट उत्तर आणि समस्या निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी स्वीकारणारी यंत्रणा मिळाली पाहिजे, असे मुख्यमंत्री म्हणाले. जागतिक क्षमता केंद्रांसाठी एकच जबाबदार सरकारी संपर्क व्यवस्था निर्माण करण्यासाठी राज्य शासन काम करणार आहे. केंद्र स्थापन करणे, त्याचा विस्तार करणे आणि उद्भवणाऱ्या समस्या सोडविणे यासाठी एक व्यक्ती आणि एक प्रणाली जबाबदारी घेईल. व्यवसाय सुलभतेचा खरा अर्थ उद्योगांना शासनाच्या कार्यालयात येताना मिळणारा अनुभव सुधारण्यात आहे आणि तो अनुभव सुधारण्याचा शासनाचा निर्धार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टात GCC ची महत्त्वपूर्ण भूमिका

महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टात जागतिक क्षमता केंद्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ही केंद्रे केवळ भांडवल घेऊन येत नाहीत, तर ज्ञान, जागतिक कार्यपद्धती, संशोधन व विकास, नेतृत्व आणि उच्च मूल्याधारित रोजगार घेऊन येतात. महाराष्ट्रातील प्रतिभावान मनुष्यबळाला ही केंद्रे थेट जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडतात आणि जागतिक पातळीवरील निर्णयक्षमतेचे सघन केंद्र निर्माण करतात, असे मुख्यमंत्री म्हणाले. उद्योग, शासन आणि शिक्षण क्षेत्राच्या संयुक्त प्रयत्नातून महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांसाठी भारतातील आघाडीचे आणि सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनविण्याचे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, महाराष्ट्र हे केवळ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्सच्या ऑपरेशन्सचे केंद्र न राहता नवोन्मेष, संशोधन, उत्पादन विकास आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे जागतिक केंद्र बनावे, ही राज्याची महत्त्वाकांक्षा आहे. पुण्याची मजबूत तंत्रज्ञान परिसंस्था, कुशल मनुष्यबळ आणि आयटी व उत्पादन क्षेत्राचा अनोखा संगम यामुळे एआय, रोबोटिक्स, सायबर सिक्युरिटी, ॲडव्हान्स्ड इंजिनिअरिंग आणि आरॲंडडीसाठी पुणे सक्षम ठरत आहे. जिसीसीच्या माध्यमातून रोजगारासोबतच संशोधन, बौद्धिक संपदा आणि जागतिक संधी निर्माण होत असून, महाराष्ट्रातील युवकांना भविष्यातील तंत्रज्ञानासाठी सक्षम करण्यावर शासनाचा भर आहे. उद्योग, शिक्षणसंस्था, स्टार्टअप्स आणि शासन यांच्या समन्वयातून महाराष्ट्राला तंत्रज्ञान व नवोन्मेषाचे जागतिक केंद्र बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. गुंतवणूकदारांना आवश्यक पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी, डिजिटल व्यवस्था आणि व्यवसाय सुलभता उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. 'महाराष्ट्र तयार आहे', पुणे तयार आहे असा विश्वासही श्रीमती पवार यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक जीसीसीप्रोज चे मुख्य सल्लागार निलेश देशमुख यांनी या एक दिवशीय परिषदेची भूमिका विशद केली. शासनाच्या सकारात्मक सहकार्याबद्दल त्यांनी राज्य शासनाला धन्यवाद दिले.

# दरडग्रस्त व पूरग्रस्त गावांच्या पुनर्वसनासाठी सुधारित धोरण लवकरच : मंत्री मकरंद जाधव-पाटील

■ मुंबई, (दै. संध्या)

अतिवृष्टी, पूर, भूस्खलन, जमिनीला भेगा पडणे, डोंगर खचणे तसेच दरडी कोसळणे आदी नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित व आपत्तीप्रवण गावांच्या पुनर्वसनासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या धोरणात आवश्यक सुधारणा करून नवीन सुधारित धोरण लवकरच तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

दरडग्रस्त व पूरग्रस्त गावांचे पुनर्वसन तसेच पुनर्वसित गावांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, आमदार हिरामण खोसकर,आमदार शरद सोनवणे, आमदार बाबाजी काळे, आमदार शंकर मांडेकर, आमदार मनोज घोरपडे,आमदार शेखर निकम यांच्यासह विभागीय आयुक्त कोकण व पुणे विभाग, सातारा, पुणे, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, गृहनिर्माण विभागाचे उपसचिव, सातारा व पुणे येथील अपर जिल्हाधिकारी व जिल्हा पुनर्वसन अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. राज्यातील विविध नैसर्गिक आपत्तीप्रवण व नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या गावठाणांचे पुनर्वसन करून तेथे नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १४ ऑक्टोबर २०२२ रोजी शासनाने धोरण निश्चित केले आहे. या धोरणात बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. दरडग्रस्त व पुनर्वसनग्रस्त गावांच्या समस्या अधिक प्रभावीपणे सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी आपल्या सूचना शासनाकडे सादर कराव्यात. व्यवहार्य व योग्य सूचनांचा समावेश सुधारित धोरणामध्ये करण्यात येईल. सुधारित धोरण अंतिम झाल्यानंतर ते मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल, असे मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.सातारा जिल्ह्यातील मौजे भैरवगड, ता. जि. सातारा येथील भूस्खलनग्रस्त कुटुंबांचे मौजे सासपडे येथे पुनर्वसन करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. या पुनर्वसनासाठी म्हाडा अथवा अन्य संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने संयुक्त बैठक घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने आढावा घेण्यात आला. कराड उत्तर मतदारसंघातील पूरपरिस्थितीमुळे पुनर्वसित झालेल्या गावांना शासन धोरणानुसार अनुज्ञेय १८ नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

# वंचित प्रकल्पबाधित आदिवासींना अनुदान देणार : मंत्री गिरीश महाजन

■ मुंबई, (दै. संध्या)

सुलवाडे-जामफळ-कनोली सिंचन प्रकल्पातील 158 बाधितांना सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले असून, उर्वरित 60 बाधितांना अद्याप अनुदान मिळालेले नाही. प्रकल्पातील अनुदान पासून वंचित प्रकल्पबाधित आदिवासींना अनुदान देण्यात येईल, अशी माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

तापी खोरे पाटबंधारे महामंडळांतर्गत धुळे जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या कामांचा आढावा जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, जलसंपदा लाभक्षेत्र विकास विभागाचे सचिव प्र. बा. मिसाळ, पाटबंधारे महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत बोरकर तसेच जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सुलवाडे-जामफळ प्रकल्पातून सिंचन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या कामांमुळे मालपूर गावातील सिंचन क्षमतेत वाढ झाली आहे. मात्र, प्रकल्पाच्या परिसरातील इतर गावांमध्ये अपेक्षित सिंचन क्षमता वाढविण्याचे काम अद्याप पूर्ण होणे बाकी आहे. ही कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

तसेच सुलवाडे-जामफळ प्रकल्पातील 132 केव्ही उपकेंद्राचे काम पूर्ण करून ते लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात येईल, असेही मंत्री महाजन यांनी सांगितले. तापी-बोराई प्रकल्पाला नाबार्डच्या योजनेतून गती देणार – पणनमंत्री जयकुमार रावल राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी धुळे जिल्ह्यातील वाडी-शेवाडी प्रकल्प, प्रकाशा-बुराई उपसा सिंचन योजना यासह विविध प्रकल्पांना गती देण्याची गरज व्यक्त केली.

# सुपने मंडळातील विकासकामांचा आढावा; पायाभूत सुविधांच्या कामांना गती द्यावी

■ सातारा , (दै. संध्या)

सुपने मंडळातील विविध प्रलंबित आणि प्रस्तावित विकासकामांचा सविस्तर आढावा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी घेतला. सुपने मंडळातील नागरी सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर पायाभूत सुविधांच्या कामांना गती देण्याचे आदेश दिले. कराड येथील विश्रामगृहात झालेल्या या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक विश्वास सिद, प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, तहसीलदार कल्पना ढवळे, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत थोरात यांच्यासह विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



पालकमंत्री श्री. देसाई यांनी सुपने मंडळातील सुरू असलेल्या विविध विकासकामांच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. ग्रामीण भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेत मिळणे गरजेचे असल्याचे सांगत, सर्व कामे दर्जात्मक आणि ठरवलेल्या मुदतीत पूर्ण करावीत, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच ज्या कामांमध्ये काही अडचणी असतील त्या प्राधान्याने सोडवून कामांचा मार्ग सुकर करावा, असेही त्यांनी सांगितले. प्रशासनाने सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे बारकाईने लक्ष देऊन प्रलंबित कामे लवकरात लवकर मार्गी लावावीत.

# युवाशक्तीच्या सामर्थ्यावर विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्र घडेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ पुणे, (दै. संध्या)

युवाशक्तीच्या सामर्थ्यावर उद्याचा विकसित भारत आणि सर्वांची स्वप्न पूर्ण करणारा, समतेचा, प्रगतीचा, युवांच्या स्वप्नांना बळ देणारा विकसित महाराष्ट्र घडेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. 'हर घर तिरंगा अभियान' अंतर्गत नामदार गोपाळकृष्ण गोखले मार्गावर आयोजित भव्य तिरंगा रॅलीला मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार रवींद्र चव्हाण, उमा खापरे, अमित गोरखे, सिद्धार्थ शिरोळे, राहुल कुल, शंकर जगताप आदी उपस्थित होते.

'इस तिरंगे को हम कभी झुकने नहीं देंगे' हे सांगण्यासाठी तरुणाई आज तिरंगा हाती घेऊन




रस्त्यावर आल्याचे सांगून देशाच्या प्रधानमंत्र्यांच्या संदेशानुसार १५ ऑगस्टपर्यंत देशाच्या प्रत्येक शहरात, गावात आपली राष्ट्रभक्ती प्रगट करण्याकरता तिरंगा झेंडा हातामध्ये घ्यावा आणि तिरंग्याची शान दाखवून द्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, तिरंगा हा केवळ झेंडा नसून देशभक्तीचे प्रतीक आहे. तिरंगा आपल्या मनात आणि जीवनात आहे. तिरंगा हाती घेतला तर आपल्याला केवळ आपले अधिकार नाही तर कर्तव्य देखील लक्षात ठेवावे लागतात. ज्या संविधानाने अधिकार दिले त्याच संविधानाने आपल्यावर काही कर्तव्ये पार पाडण्याची जबाबदारीदेखील टाकली आहेत. त्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचे काम आपल्याला करायचे आहे, असेही ते म्हणाले.

प्रधानमंत्री मोदींनी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विकसित महाराष्ट्र उभा करायचा आहे. पुणे महाराष्ट्राची विद्यानगरी, महाराष्ट्राची नवोन्मेषाची नगरी तसेच महाराष्ट्राची उद्योग नगरी आहे. पुण्यनगरी भारताचं एक सांस्कृतिक बलस्थान आहे. या पुण्याच्या युवाशक्तीच्या भरोशावर उद्याचा भारत आपण पाहणार आहोत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तिरंग्याच्या सन्मानासाठी अनेकांनी आपले प्राण दिले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन

बुलढाणा : शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील ३४ हजार ८७५ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर २९५.४७ कोटी रुपयांचा निधी थेट वितरित करण्यात आला आहे. ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण करा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात एकूण १ लाख १५ हजार ५१६ शेतकरी पात्र ठरले आहेत. त्यापैकी ८५ हजार ४५३ शेतकऱ्यांनी आतापर्यंत आपले आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) पूर्ण केले आहे, तर अद्याप ३० हजार ०६३ शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण बाकी आहे. पहिल्या यादीतील ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे प्रमाणीकरण पूर्ण होताच लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने जमा केली जाणार आहे. राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आर्थिक बळ मिळेल. चालू हंगामात पीक कर्ज वाटपासाठी बँकांनी आवश्यक नियोजन पूर्ण केले असून, शेतकऱ्यांनी बँकेत अनावश्यक गर्दी न करता प्रशासनास सहकार्य करावे. तसेच ज्या पात्र शेतकऱ्यांनी अजूनही आधार प्रमाणीकरण केलेले नाही, त्यांनी जवळच्या ई-सेवा केंद्रात जाऊन ते त्वरित पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी केले आहे.

### पालकमंत्र्यांनी जनसंवाद सभेत घेतला आढावा

सांगली : पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या शासकीय जनसंवाद उपक्रमातून नागरिकांचे प्रलंबित प्रश्न सुटण्यास मदत होत आहे. बहुतांश निवेदनांवर कार्यवाही होऊन प्रश्न मार्गी लागत असल्याने अनुपालन आढावा सभेत अनेकांनी पालकमंत्र्यांचे मनापासून आभार व्यक्त केले आहेत. शासकीय जनसंवाद या उपक्रमांतर्गत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दि. 30 जुलै रोजी झालेल्या पहिल्या सभेत नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या होत्या. या सभेत नागरिकांची जवळपास 100 निवेदने प्राप्त झाली होती. त्यावर गेल्या आठवडाभरात शासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा या अनुपालन सभेत घेण्यात आला. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, शासकीय अधिकाऱ्यांनी प्राप्त प्रत्येक निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन संवेदनशीलतेने काम करावे. लोकाभिमुख, पारदर्शकतेने काम करत नागरिकांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य द्यावे. नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच मंत्रालय स्तरावरील प्रकरणांचा आपण स्वतः पाठपुरावा करू, अशी ग्वाही यावेळी त्यांनी संबंधितांना दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या या शासकीय जनसंवाद अनुपालन सभेस जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, उपजिल्हाधिकारी शिवाजी जगताप आणि समाधान शेंडगे, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नवीन 'एसओपी' निश्चित करणार

गडचिरोली : धानोरा तालुक्यातील जपतलई येथील अनुदानित आश्रमशाळेत घडलेली सर्पदंशाची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आश्रमशाळांमधील विद्यार्थी सुरक्षेचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्यात येतील. तसेच आश्रमशाळांसाठी नवीन प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करण्यात येईल, असे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले. जपतलई (ता. धानोरा) येथील अनुदानित आश्रमशाळेच्या वसतिगृहात रात्री सुमारे २ वाजता विद्यार्थिनींना सर्पदंश झाल्याची घटना घडली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जेजुरी देवसंस्थानच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप

**जेजुरी : दैनिक संध्या**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री मार्तंड देव संस्थांनच्या वतीने दुर्गम भागातील तरसदरा येथील अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. जेजुरी देवसंस्थानचे विश्वस्त अॅड पांडुरंग थोरवे यांच्या हस्ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तरसदरा व अंगणवाडी केंद्र तरसदरा येथे ग्रंथालय कपाट, विद्यार्थ्यांना खेळाचे गणवेश, स्कूल बॅग व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी अंगणवाडी सेविका सुवर्ण सोनावणे मीराबाई कदम, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा ललिता माने,विजय माळवदकर,पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक सचिन सातभाई यांनी केले. आभार मुख्याध्यापक संदीप दुर्गाडे यांनी मानले.

### विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चरला सहा डिझाईन पेटंट प्राप्त

**बारामती : दैनिक संध्या**

विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या (VPSOA) विद्यार्थ्यांनी संकल्पित व विकसित केलेल्या एकूण सहा उत्पादनांना भारत सरकारकडून डिझाईन पेटंटचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.अवघ्या दीड वर्षाच्या कालावधीत सर्व सहा उत्पादनांची पेटंट नोंदणी पूर्ण होऊन प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. ही सर्व उत्पादने विद्यार्थ्यांच्या सर्जनशील संकल्पना,कल्पकता व नाविन्यपूर्ण विचारातून विकसित झाली असून,त्यासाठी प्राध्यापकांचे तांत्रिक मार्गदर्शन, सातत्यपूर्ण प्रोत्साहन आणि सहकार्य लाभले. त्यांना इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स (Intellectual Property Rights) हक्कांच्या माध्यमातून अधिकृत मान्यता मिळाली. या संपूर्ण प्रक्रियेत संस्थेच्या इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स (IPR) विभागाच्या प्रमुख आर्कि.प्रा.रेवती डवरे-देवमाने यांनी संपूर्ण काम पाहिले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यावसायिक व बौद्धिक मान्यता मिळवून देण्याच्या दृष्टीने स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या, इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स (IPR Cell) भविष्यातही अशा प्रकारच्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या सहा डिझाईन पेटंटची प्राप्ती ही विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या शैक्षणिक, संशोधनात्मक आणि नवनिर्मितीक्षम वाटचालीस महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. या यशाबद्दल विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.श्री. शरदचंद्रजी पवार, उपाध्यक्ष अॅड.अशोक प्रभुणे, खजिनदार श्री.युगेंद्रदादा पवार, सचिव अॅड.नीलिमाताई गुजर, रजिस्ट्रार कर्नल श्रीश कंभोज आणि सर्व व्यवस्थापन समिती सदस्यांनी तसेच प्राचार्या.राजश्री पाटील, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनीही अभिनंदन केले.

### अधिक पार्किंग शुल्क वसूल करणाऱ्या वाहनतळ ठेकेदारावर ₹५,००० दंड

**आळंदी : दैनिक संध्या**

चाकण चौक, झाडीबाजार येथील नगरपरिषदेच्या वाहनतळावर निर्धारित दरापेक्षा अधिक पार्किंग शुल्क आकारल्याप्रकरणी वाहनतळ ठेकेदार निशिकांत किरण चव्हाण यांच्यावर आळंदी नगरपरिषदेमार्फत कारवाई करण्यात आली आहे. नगरपरिषदेने वाहनांच्या प्रकारानुसार निश्चित केलेल्या दरांपेक्षा अधिक पार्किंग शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी तसेच एका दैनिकात प्रसिद्ध झालेल्या वृत्ताच्या अनुषंगाने नगरपरिषदेने सदर प्रकरणाची दखल घेतली. त्यानुसार वाहनतळ ठेकेदार श्री. निशिकांत चव्हाण यांना रु. ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) दंड आकारण्यात आला असून, सदर दंडाची रक्कम चलनाद्वारे नगरपरिषदेकडे जमा करून घेण्यात आली आहे. तसेच, वाहनतळावर यापुढे नगरपरिषदेने निर्धारित केलेल्या दरानुसारच पार्किंग शुल्क वसूल करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. पुन्हा निर्धारित दरापेक्षा अधिक शुल्क वसूल केल्याचे निदर्शनास आल्यास ठेका रद्द करून अनामत रक्कम जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल, अशी नोटीसही संबंधित ठेकेदारास बजावण्यात आली आहे. नगरपरिषदेकडून नागरिकांकडून निर्धारित दरापेक्षा अधिक पार्किंग शुल्क आकारले जाणार नाही, यासाठी नियमित तपासणी करण्यात येणार असून, नागरिकांनी अधिक शुल्क आकारल्याचे निदर्शनास आल्यास त्याची माहिती नगरपरिषद प्रशासनाकडे द्यावी, असे आवाहन मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.



### वाल्हेत संत सावतामाळी महाराजांची पुण्यतिथी साजरी

**वाल्हे : दैनिक संध्या**

*स्वकर्मात व्हावे रत !! मोक्ष मिळो हातो हात !!*
*सावत्याने केला मळा !! विठ्ठल देखियला डोळा !!*

या उक्ती प्रमाणे कर्म हेच दैवत असा संदेश देणारे थोर संत सावतामाळी महाराज यांची पुण्यतिथी वाल्हे ( ता. पुरंदर ) नगरीत भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी येथील सावतामाळी मंदिरात संत सावतामाळी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात कीर्तन प्रवचन व इतरही धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात संपन्न झाले.या दरम्यान सावतामाळी महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन करून धार्मिक परंपरेनुसार प्रतिमेची मिरवणूक देखील काढण्यात आली.या मिरवणुकीत वाल्हे पंचक्रोशीसह जेऊर मांडकी पिंगोरी पिसुर्टी दौंडज आदी भागातील भाविकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शवला होता. तर ह. भ. प. मंगेश महाराज कदम यांच्या काल्याच्या कीर्तन सेवेमुळे संपूर्ण वाल्हे नगरीच जणू भक्तीसागरात चिंब झाल्याचे चित्र पहावयास मिळाले. यावेळी सावतामाळी समाज मंडळाकडून या धार्मिक कार्यक्रमांची चांगल्याप्रकारे व्यवस्था करण्यात आल्याने ग्रामस्थांनी देखील समाधान व्यक्त केले.



# एल अँड टीच्या सीएसआरमधून कर्नलवाडी शाळेचा कायापालट

■ नीरा (दै. संध्या)

लार्सन अँड टुब्रो (L&T) कंपनीच्या सीएसआर निधीतून कर्नलवाडी येथील जि. प. प्राथमिक शाळेचा संपूर्ण कायापालट करण्यात आला आहे. शाळेच्या इमारतीची दुरुस्ती, रंगरंगोटी तसेच शाळेच्या भिंतींवर विविध शैक्षणिक व आकर्षक चित्रे साकारण्यात आल्याने शाळेचा परिसर बोलक्या भिंतींनी सजला आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आनंददायी व शैक्षणिक वातावरण मिळाले आहे.

शाळेच्या संपूर्ण इमारतीची रंगरंगोटी करून भिंतींवर विविध प्रकारची चित्रे काढण्यात आली आहेत. बोलक्या भिंतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे विविध विषय सहज व आकर्षक पद्धतीने समजावेत, हा यामागील उद्देश आहे. या संपूर्ण कामासाठी कर्नलवाडी गावातील माजी विद्यार्थी व एल अँड टीचे अधिकारी प्रविण बाळासाहेब निगडे यांनी विशेष सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यातूनच शाळेच्या विकासाला मोठी चालना मिळून शाळेचा कायापालट झाला.

या कामाच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन शनिवारी (दि. ८) करण्यात आले. यावेळी लार्सन अँड टुब्रो कंपनीचे संपूर्ण पथक उपस्थित होते. शाळेच्या वतीने कंपनीच्या प्रतिनिधींचे विशेष आभार मानण्यात आले.

कार्यक्रमास राख केंद्राचे केंद्रप्रमुख सचिन सोनवणे, कर्नलवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच सुवर्णा महानवर, माजी उपसरपंच नंदकुमार निगडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल निगडे, माजी विद्यार्थी पृथ्वीराज निगडे, बाळासाहेब निगडे, भरत निगडे, दिपक निगडे सर, तसेच ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कंपनीच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी कंपनीचे अधिकारी संदीप डाके, गणेश पटेल, गोविंदा सर, ऋषिकेश जाधव, रेड्डी सर, शैलेश सर, प्रविण निगडे, सुधांशू आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक अनिल नेवसे यांनी केले. तर आभार दिपक निगडे यांनी मानले. शाळेच्या विकासासाठी कंपनीने केलेल्या सहकार्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. बोलक्या भिंती, रंगीबेरंगी परिसर आणि शैक्षणिक साहित्यामुळे कर्नलवाडीची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आता विद्यार्थ्यांसाठी अधिक आकर्षक आणि आनंददायी शिक्षणकेंद्र बनली आहे.

## कोयत्यासह रेकॉर्डवरील गुन्हेगार जेरबंद



■ चाकण (दै. संध्या)

चाकण उत्तर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने कोयत्यासह रेकॉर्डवरील एका सराईत गुन्हेगारास जेरबंद केले. कृष्णा सुनील भंडलकर (वय १९, रा. भुजबळ आळी, चाकण.) असे धारदार कोयत्यासह जेरबंद केलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. चाकण उत्तर पोलीस स्टेशनचे तपास पथक पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये त्यांना हव्या असलेल्या (वाँटेड) आणि तडीपार आरोपींचा शोध घेत गस्त घालत होते. या दरम्यान चाकण मधील चक्रेश्वर रोड परिसरामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांना रेकॉर्डवरील आरोपी कृष्णा भंडलकर हा संशयास्पदरीत्या मिळून आला. तपास पथकाने तातडीने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक बेकायदेशीर व जीवघेणा धारदार कोयता मिळून आला. चाकण पोलिसांनी त्याच्याकडून कोयता जप्त करून त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली. आरोपी कृष्णा भंडलकर याच्याविरुद्ध चाकण उत्तर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा (आर्म्स ऍक्ट) कलम ४(२५) आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) व १३५ अन्वये गुन्हा दाखल करून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली. चाकण उत्तर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

## स्वातंत्र्य दिनासाठी खादी भांडारात राष्ट्रध्वजाला चांगली मागणी

■ बारामती (दै. संध्या)

देशाचा स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहणसाठी खादीचे मान्यताप्राप्त विविध साईज मधील तिरंगा झेंड्याला बारामतीत चांगली मागणी असल्याची महिती येथील "सागर खादी भांडारचे ध्वज विक्रेत्यांनी दिली.

हातानी कातून हातमागावर विणलेल्या कपड्यापासून खादी राष्ट्रध्वजाची निर्मिती करण्यात येते,ध्वज संहितेनुसार विविध साईज मधील राष्ट्र ध्वजाची निर्मिती केली जाते, आपल्या देशात २६ जानेवारी म्हणजे प्रजासत्ताक दिन आणि १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन, स्वातंत्र्य दिन, एक मे महाराष्ट्र दिन, आणि ९ ऑगस्ट क्रांती दिना करिता ध्वजा रोहण करण्याची परंपरा आहे,

यासाठी विविध सामाजिक संघटना, संस्था, ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगर पालिका, जिल्हा परिषद प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, सेवा संघटना यांच्या कडून राष्ट्र ध्वजाला चांगली मागणी असते, अशी महिती खादी भांडार मधून देण्यात आली, भारताला स्वातंत्र १९४७ साली मिळाले परंतु बारामती शहरातील सागर खादी भांडार हे खादी भांडार स्वातंत्र्य पुर्व काळापूर्वी म्हणजे १९४० साला पासून



कार्यरत आहे,या दुकानातील आज तिसरी पिढीने खादीची जुनी परंपरा पुढे चालवीत आनलेंली आहे, राष्ट्रीय तिरंगा ध्वज या मध्ये दीड बाय दोन,दोन बाय तीन,तीन बाय साडेचार,चार बाय सहा,सहा बाय आठ,विविध अश्या साईज मधील खादीचे तिरंगा झेंडे विक्री साठी उपलब्ध आहेत,

सर्व सामान्य नागरिकांनी तिरंगा झेंडे मान्यता प्राप्त खात्री पूर्वक खादी भांडार मधूनच खरेदी करावी,म्हणजेच ग्राहकांची फसवणूक होणार नाही, सध्या काळात हल्ली प्लास्टिक, मधील आणि नॉयलान,टेरिकोट, पॉलिस्टर कपड्या मधील प्रकारतील तिरंगा ध्वज बाजारात विकत मिळतात, शत्या झेंड्याना मान्यता नाही,अशी महिती" सागर खादी भांडार "मधील विक्रेत्यानीं दिली.

राष्ट्रीय तिरंगा ध्वज संहितेचे पालन करावे,तिरंगा ध्वज हा फाटलेला, मळलेला,आणि चूरगळलेला नसावा,तिरंगा ध्वज हा व्यवस्थित पद्धतीने साईज मधील शिलाई केलेला असावा,

ध्वजारोहनाशिवाय कोणत्याही इतर गोष्टी साठी तिरंगा ध्वजचा वापर होता कामा नये,तिरंगा राष्ट्रध्वज फडकविताना भगवा म्हणजे नारंगी कलर नेहमीच वरच्या बाजूला असावा, यांची काळजी घ्यावी,ध्वजा रोहण करताना तिरंगा ध्वजा मध्ये सुट्टी फुले, हार,ठेवू नये,या मुळे ध्वज खराब होऊ शकतो,अशी महिती सुद्धा खादी भांडार मधील विक्रेत्यानीं आमच्या प्रतिनिधी यांच्याशी बोलताना दिली.

स्वातंत्र्यपुर्व काळापासून बारामतीत सागर खादी भांडार हे स्वदेशी कापड दुकान आहे,पुणे जिल्ह्यातील पहिले खादी भांडार म्हणजे १९४२ च्या चळवळी पूर्वी या स्वदेशी खादी भंडारची सुरुवात झाली, "स्वदेशी वापरा देश वाचवा", हा नारा या काळात देण्यात आला होता,तोच नारा आज सुद्धा लागू होत आहे,या दुकानाने तिसऱ्या पिढीसह स्वदेशी खादी विक्रीची जुनी परंपरा आजही कायम ठेवलेली आहे, स्वदेशी खादी खरेदीवर विशेष सूट सुद्धा या काळात दिली जाते,अशी माहिती सुद्धा खादी विक्रेते यांनी या वेळी बोलताना दिली.

## खड्ड्यांना कंटाळलेल्या ग्रामस्थांनीच हातात घेतली कुदळ

**श्रमदानातून दीड किलोमीटरचा रस्ता केला दुरुस्त**



■ नीरा (दै. संध्या)

गेल्या सात वर्षांपासून रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांचा सामना करणाऱ्या पुरंदर तालुक्यातील थोपटेवाडी ग्रामस्थांनी अखेर प्रशासनाची वाट न पाहता श्रमदानातून रस्ता दुरुस्तीचा उपक्रम हाती घेतला. बुधवारी ग्रामस्थांनी एकत्र येत खडी व क्रश टाकून थोपटेवाडी ते पुणे-पंढरपूर महामार्गाला जोडणाऱ्या सुमारे दीड किलोमीटर रस्त्यावरील खड्डे बुजवले.

थोपटेवाडी येथे जाणाऱ्या या रस्त्याचे काम सुमारे दहा वर्षांपूर्वी करण्यात आले होते. त्यानंतर देखभालीअभावी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले. हा मार्ग पुढे गुळुंचे तसेच नीरा-मोरगाव रस्त्याला जोडला जात असल्याने या रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे रस्ता वारंवार खराब होत असून, नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. रस्त्याची दुरुस्ती करावी, यासाठी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे वारंवार मागणी केली. मात्र सात वर्षांपासून मागण्या करूनही कायमस्वरूपी उपाययोजना न झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी होती. अखेर प्रशासनाची वाट न पाहता ग्रामस्थांनीच पुढाकार घेत श्रमदानातून रस्त्यावरील खड्डे बुजविले. या श्रमदानामुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी रस्त्याची अवस्था पाहता ही दुरुस्ती कायमस्वरूपी उपाय नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने या संपूर्ण रस्त्याची पाहणी करून डांबरीकरणासह कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

या श्रमदानात नितीन साळुंखे, उत्तम थोपटे, राजेंद्र थोपटे, भाऊसाहेब थोपटे, रामभाऊ थोपटे, संदीप थोपटे, किरण भोसले, दीपक थोपटे, गणेश थोपटे, किरण साळुंखे, विनोद थोपटे, विश्वास थोपटे, सुभाष खरात, आकाश थोपटे, सार्थक थोपटे, अमोल थोपटे, तुषार थोपटे, सौरभ थोपटे, जयदीप थोपटे, प्रवीण साळुंखे, अक्षय थोपटे, नैतिक साळुंखे, महेंद्र दगडे यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी सहभाग घेतला.

## बार्टी अधिछात्रवृत्ती प्रश्नावर मंत्रालयात संयुक्त बैठक

**विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचे आश्वासन**

■ पुणे (दै. संध्या)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) अंतर्गत पीएच. डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या प्रलंबित अधिछात्रवृत्तीच्या मागण्यांसाठी 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन' आणि अधिछात्रवृत्तीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने आज पुणे येथील शासकीय विश्रामगृहात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळाने विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन मंत्री शिरसाठ यांना सादर केले. या भेटीदरम्यान मंत्री संजय शिरसाठ यांनी अधिछात्रवृत्तीसाठी अर्ज केलेले विद्यार्थी, संशोधक तसेच विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या मागण्यांमागील तांत्रिक व व्यावहारिक अडचणी समजून घेत त्यांनी संबंधित विषयाची माहिती घेतली. बार्टीच्या केवळ १०० अधिछात्रवृत्तीच्या जागांमुळे मोठ्या संख्येने पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचा मुद्दा शिष्टमंडळाने उपस्थित केला. तसेच ३५ वर्षांच्या वयोमर्यादेच्या अटीमुळे अनेक विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधीपासून वंचित राहावे लागत असल्याचेही मंत्री शिरसाठ यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

विद्यार्थ्यांची भूमिका आणि विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन या प्रश्नावर सकारात्मक व कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पुढील मंगळवारी मंत्रालयात संबंधित उच्चपदस्थ अधिकारी आणि विभागांची संयुक्त बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री संजय शिरसाठ यांनी शिष्टमंडळाला दिले. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर चर्चा करून मार्ग काढण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मंत्री शिरसाठ यांनी दिलेल्या आश्वासनाचे शिष्टमंडळाने स्वागत केले आहे.


# हॉटेल संग्रामसमोरील अनधिकृत 'यू टर्न' ठरला जीवघेणा

**दोघांचा जागीच मृत्यू**

■ कवठे येमाई (दै. संध्या)

पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील हॉटेल संग्रामसमोरील अनधिकृतपणे तोडलेल्या दुभाजक मुळे बुधवारी दि. ११ सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात तरुण उद्योजक किशोर नामदेव यादव (३८, रा. वाडेगव्हाण, ता. पारनेर) आणि प्रथमेश प्रकाश लाड (३०, रा. सुंदर सृष्टी, शिरूर; मूळ रा. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली) यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने शिरूर, पारनेर व श्रीगोंदा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

हॉटेल संग्रामसमोरील दुभाजकाचा भाग तोडल्याने येथे अनधिकृत 'यू टर्न' निर्माण झाला असून, वाहनचालक शॉर्टकट म्हणून त्याचा वापर करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. भरधाव महामार्ग वाहतुकीत अचानक वळणारी वाहने येत असल्याने हे ठिकाण अपघातप्रवण बनले आहे.



बुधवारी सायंकाळी किशोर यादव यांच्या एंडेवर मोटारीला मागून भरधाव कंटेनरने धडक दिली. त्यानंतर मोटार दुभाजकाजवळ उभ्या असलेल्या प्रथमेश लाड यांच्या दुचाकीवर आदळली. दोन्ही वाहने विरुद्ध दिशेला गेल्यानंतर समोरून येणाऱ्या शिवाई बसची धडक बसली. या भीषण अपघातात यादव व लाड यांचा जागीच मृत्यू झाला. 'आणखी किती जीव गेल्यानंतर प्रशासन जागे होणार?' असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. तुटलेला दुभाजक तातडीने पूर्ववत करून अनधिकृत 'यू टर्न' बंद करावा, तसेच या ठिकाणी दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर व पुरेशी प्रकाशयोजना करावी, अशी मागणी होत आहे. अपघातानंतर पोलिस निरीक्षक विनोद पाटील व उपनिरीक्षक गोविंद खटींग यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, दुभाजक कोणी तोडला, तो पूर्ववत का करण्यात आला नाही आणि अनधिकृत मार्ग सुरू राहण्यास जबाबदार कोण? याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

दोन निष्पाप जीवांचा बळी गेल्यानंतर तरी प्रशासनाने हा 'मृत्यूचा यू टर्न' कायमचा बंद करावा, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.